POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१९६ ● मुंबई, मंगळवार, १७ फेब्रुवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ठाणे जिल्ह्यातील पहिला कोस्टल रोड!

### मुंबई, नाशिकसह थेट गुजरातला जाण्यासाठी पर्यायी मार्ग... ₹.३३,६४,००,००,००० रुपयांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

मुंबई प्रमाणे ठाण्यातही कोस्टल रोड बांधण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील हा पहिला कोस्टल रोड आहे. यामुळे घोडबंदर रोडवरील वाहतूक कोंडीतून हजारो वाहन चालकांची सुटका होणार आहे. या कोस्टल रोडमुळे मुंबई, नाशिक सह थेट गुजरातला जाण्यासाठी पयार्यी मार्ग मिळणार आहे. ₹.३३,६४,००,००,००० रुपयांचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे.

बाळकुंभ ते गायमुख दरम्यान १३.४५ किलोमीटर लांबीचा हा ६ पदरी ठाणे कोस्टल रोडचे बांधकाम वेगाने सुरू आहे. ३,३६४ कोटी रुपये खर्चून बांधण्यात येत आहे. या महत्त्वाकांक्षी कोस्टल रोड प्रकल्पाचे काम आठ महिन्यांपूर्वी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) सुरू केले होते. आठ महिन्यांतच प्राधिकरणाने कोस्टल रोडच्या पायाभूत कामाचे ५० टक्के काम पूर्ण केले आहे. पायाभूत कामानंतर, खांबांवर पिलर कॅप्स आणि आय गर्डर्स बसवण्याचे काम सुरू झाले आहे.



**देशातील पहिला ग्रीनफिल्ड रोड**

एमएमआरडीएच्या मते, ठाणे कोस्टल रोड हा देशातील पहिला ग्रीनफिल्ड कोस्टल रोड प्रकल्प आहे. या प्रकल्पात पहिल्यांदाच मोनोपाइल फाउंडेशन, सिंगल पाइल आणि सिंगल पिलर तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. पर्यावरण संवर्धन आणि खारफुटी क्षेत्रांचे संरक्षण करण्यास प्राधान्य देऊन, रस्त्याचा मोठा भाग उड्डाणपूल म्हणून विकसित केला जाईल.

**मुंबई-नाशिक महामार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा**

या कोस्टल रोडवरील एका मार्गिकेवर फक्त मालवाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी असणार आहे. कोस्टल रोडमुळे मुंबई-नाशिक महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनांना पयार्यी मार्ग उपलब्ध होईल. गर्दीच्या वेळी घोडबंदर रोडवर वाहनांच्या लांब रांगा नेहमीच असतात. भिवंडी आणि कळवा येथून घोडबंदर रोडकडे जाणारे वाहनचालक बाळकुंभजवळ ट्रॅफिक जाममध्ये अडकतात. जर महामार्गावर वाहन बिघाड झाला किंवा अपघात झाला तर अनेक किलोमीटर लांब रांगा लागू शकतात. कोस्टल रोड पूर्ण झाल्यानंतर, नाशिक, भिवंडी, गुजरात आणि मुंबई उपनगरांकडे जाणाऱ्या वाहनांना पयार्यी मार्ग मिळेल. बाळकुंभ येथून कोस्टल रोडवर थेट प्रवेश शक्य होईल.

**कोस्टल रोड महत्वांच्या मार्गांशी जोडणार**

एमएमआरडीएने कोस्टल रोडला प्रस्तावित गायमुख-फाउंटन हॉटेल टनेल प्रकल्पाशी जोडण्याची योजना आखली आहे. एकदा हे प्रकल्प जोडले गेले की, वाधवान बंदर, जेएनपीटी, दक्षिण महाराष्ट्र आणि कर्नाटक येथे जाणाऱ्या आणि येणाऱ्या वाहनांना ठाण्यात वाहतूक कोंडीचा सामना करावा लागण्याची शक्यता कमी होईल. याव्यतिरिक्त, कोस्टल रोड ठाणे रिंग मेट्रो आणि साकेत-अमाणे एलिव्हेटेड कॉरिडॉरशी जोडण्याची योजना आहे.

## महाराष्ट्र विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६चे वेळापत्रक जाहीर

### 'या' दिवशी सादर होणार राज्याचा अर्थसंकल्प!

**बजेट कधी सादर होणार?**

मार्च महिन्यातील कामकाजाचा विचार करता, १ मार्च (रविवार) आणि २ मार्च रोजी बैठक होणार नाही, तर ३ मार्चला होळीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असेल. या अधिवेशनातील सर्वात महत्त्वाचा दिवस म्हणजे शुक्रवार, ६ मार्च २०२६ असून, या दिवशी दुपारी २:०० वाजता राज्याचा सन २०२६-२०२७ चा अर्थसंकल्प सादर केला जाईल. त्यानंतर ९ आणि १० मार्च रोजी अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा होईल. १ मार्च ते १६ मार्च या कालावधीत अर्थसंकल्पीय मागण्यांवर चर्चा आणि मतदान पार पडेल, ज्यामध्ये १६ मार्च रोजी विनियोजन विधेयक सादर केले जाईल. अधिवेशनाच्या उत्तरार्धात, १९ मार्चला गुढीपाडव्याची सुट्टी असेल आणि २० मार्चला बैठक होणार नाही. २४ मार्च रोजी अंतिम आठवडा प्रस्ताव मांडला जाईल आणि २५ मार्च रोजी शासकीय कामकाजासह अधिवेशनाची सांगता होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासासाठी मंत्र्यांची पाच गटांत विभागणी करण्यात आली असून, संबंधित दिवशी त्या त्या गटातील मंत्री प्रश्नांना उत्तरे देतील. या नियोजित वेळापत्रकात कामकाजाच्या गरजेनुसार फेरफार होऊ शकतो, असे विधानसभा सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे यांनी १० फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध केलेल्या पत्रकात नमूद केले आहे.



**■मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची अधिकृत दिनदर्शिका जाहीर झाली आहे. हे अधिवेशन २३ फेब्रुवारी ते २५ मार्च २०२६ या कालावधीत मुंबई येथील विधानभवनात पार पडणार आहे. राज्याचा अर्थसंकल्प कधी सादर होणार आणि महिनाभर चालणाऱ्या या अधिवेशनात नेमके कोणते महत्त्वाचे टप्पे असतील, याचा सविस्तर तपशील समोर आला आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, सोमवार, २३ फेब्रुवारी रोजी राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल, शोक प्रस्ताव मांडले जातील आणि सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्या सादर केल्या जातील. त्यानंतर २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा होईल, तर २६ व २७ फेब्रुवारीला पुरवणी मागण्यांवर चर्चा आणि मतदान होऊन २७ फेब्रुवारीला पुरवणी विनियोजन विधेयक मांडले जाईल. २८ फेब्रुवारी रोजी देखील शासकीय कामकाज सुरू राहील.

## प्रवासी आणि पादचाऱ्यांसाठी अतिक्रमण हटवून रस्ते मोकळे करणार : मंत्री मंगलप्रभात लोढा

**■मुंबई। प्रतिनिधी,**

दक्षिण मुंबईतील पश्चिम रेल्वे वरील महत्वाची स्थानके लवकरच अतिक्रमण मुक्त आणि सुशोभित होणार आहेत. मुंबई सेंट्रल, ग्रांट रोड आणि चर्नी रोड स्थानकात लवकरच सरकते जिने बसवण्यात येणार असून स्थानकांचे सुशोभीकरणही करण्यात येणार आहे. कॅबिनेट मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी स्थानिकांसह आज चर्चगेट येथील पश्चिम रेल्वेच्या मुख्यालयात मुख्य व्यवस्थापक श्री. विजयकुमार यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. या भेटीनंतर लवकरच स्थानिकांच्या तक्रारी नुसार योग्य कार्यवाही करण्यात येणार असल्याचे कुमार यांनी सांगितले.



राज्याचे कॅबिनेट मंत्री श्री मंगलप्रभात लोढा यांनी दक्षिण मुंबईतील मुंबई सेंट्रल,ग्रँट रोड आणि चर्नी रोड स्थानक परिसरातील विविध समस्यांबाबत पश्चिम रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक श्री. विजयकुमार यांची भेट घेतली. मुंबई शहरात मोठ्या प्रमाणात ठिकठिकाणी घुसखोरी वाढत असून अनधिकृत फेरीवाल्यांचा विळखा पडला आहे. यातले अनेक फेरीवाले बांगलादेशी रोहिंगे असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे स्थानक परिसरात अनधिकृत फेरीवाल्यावर कारवाई करावी. तसेच रस्त्यावर अनेक ठिकाणी गर्दुल्ले वावरताना दिसत आहेत. त्यामुळे प्रवाश्यांना आणि पादचार्यांनाही विनाकारण याचा उपद्रव सहन करावा लागत आहे.

स्थानिकांच्या या समस्या गांभीयार्ने घेऊन पश्चिम रेल्वेने याबाबत त्वरित कारवाई करावी अशी मागणी यावेळी मंत्री लोढा यांनी कुमार यांच्याकडे केली. त्याचबरोबर चर्नी रोड स्थानक ते गिरगावला जोडणारा पूल रखडला असून यातही रेल्वेने सहकार्याची भूमिका घ्यावी. त्याचबरोबर स्थानकात सरकते जिने बसवून वयोवृद्ध प्रवाश्यांना लवकरात लवकर सुविधा उपलब्ध करून द्यावी असेही मंत्री लोढा यांनी म्हटले आहे.

दरम्यान, पश्चिम रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक श्री. विजयकुमार यांनी समस्या जाणून घेतल्यानंतर यावर लगेचच अहवाल तयार करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले आहेत. हा अहवाल आल्यानंतर यावर त्वरित कार्यवाही करून प्रवाश्यांच्या समस्यांचे निराकरण करू असे सांगितले. स्थानकांच्या सुशोभीकरणाच्या प्रस्ताव ही प्रलंबित असल्याचे त्यांनी मान्य केले असून लवकरात लवकर स्थानकाचा परिसर स्वच्छ आणि सुशोभित करू असे आश्वासन दिले आहे. या बैठकीला कौशिकजी शाह यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते.

## तरुण सीएसएमटी स्टेशनच्या ट्रॅकवर डोकं ठेवून झोपला, समोरुन लोकल आली अन्...

### भयंकर प्रकाराने प्रवाशांमध्ये खळबळ

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या रेल्वेस्टेशनवर धक्कादायक घटना घडलेली पाहायला मिळाली. एका तरुणाने चक्क स्टेशनच्या ट्रॅकवर झोप घेतली. हे दृश्य पाहताच या स्टेशनवरील प्रवाशांची त्रेधा तिरपीट झाली. तरुण रुळांवर झोपला आणि तितक्यात स्टेशनवर लोकलची एन्ट्री झाली. यानंतर प्रवाशांमध्ये एकच खळबळ उडाली. काही सजग प्रवाशांनी मोटरमनला याबाबतची माहिती आवाज देऊन कळवल्याने समोरील प्रसंग टळला आहे. मोटरमनने सदरील प्रकार समजताच गाडीला ब्रेक लावला आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

परंतू सदरील प्रकाराने काहीकाळ स्टेशनवरील वातावरण फार गंभीर बनले होते. असे प्रकार यापुढे तरी घडू नयेत यासाठी आता खबरदारी घेणं तितकचं गरजेचं आहे.



**सीएसएमटी स्टेशनवर लक्ष**

दरम्यान, या गंभीर प्रकारानंतर पोलिसांकडून सीएसएमटी स्टेशनच्या सर्व फलाटांवर आणि हालचालींवर बारीक लक्ष ठेवण्यात आलं होतं. रेल्वे पोलिसांनी सदरील तरुणाची चौकशी सुरु केली आहे. तो हा प्रकार का करत होता, रुळांवर तो कसा पोहोचला याचीही माहिती मिळवण्याचा तपास पोलिस करत आहेत.

**तरुणावर गुन्हा दाखल**

हा तरुण दारुच्या नशेत होता, तसेच हा तरुण स्टेशनवर भीक मागणारा असावा अशी प्राथमिक शक्यता वर्तवली जाते आहे. पोलिसांच्या चौकशी अंती याबाबतची सर्व माहिती समोर येणार आहे. तरुण दुपारी ३ वाजता फलाट क्रमांक १ वर मद्यधुंद अवस्थेत रुळांवर झोपी गेला होता. या तरुणाच्या कृतीमुळे आता काही काळ रेल्वेसेवा विस्कळीत झाली. त्यामुळे त्याच्यावर रेल्वे कायदा कलम १४५ अंतर्गत गुन्हा दाखल केल्याची माहितीही समोर आली आहे.

**नेमकं काय घडलं?**

सीएसएमटी हे स्टेश नेहमीच गर्दीने व्यावरलेले असते. स्टेशनच्या रुळांवर लोकल गाडी येताना काही मिनिटे वाचावरण तणावाचे बनले होते. काही सजग मुंबईकरांनी ही घटना पोलिसांनाही कळवली. त्यानंतर तात्काळ रेल्वे पोलिस घटनास्थळावर दाखल झाले. परिस्थिती पाहून त्यांनी संबंधित तरुणाला सुरक्षितरित्या ताब्यात घेतलं, त्यानंतर पुढे होऊ शकत असलेला प्रकार टळला आहे.

## महादेवाला त्रिशूळ अर्पण केला अन् वाहन उलटले, शिवभक्तांवर काळाचा घाला...

**जखमींची नावे समोर**

मयूर वनशिंगे (१६), राजू किसन शिवरकर (४२), राजू जाधव (४०), मंथन डाहूले (१३), लकी भडके (२०), नानाजी मरस्कोल्हे (७०), गणेश खापणे (४०), मारोती शिवरकर (४५), विनोद गौरकर (५०), रोशन माडवे (१७), मारोती बदखल (५०) आणि सोहम भोयर (१६), प्रवीण आवारी, गुरुवेश राजेश जाधव (१४), ओंकार शिवशंकर मांढरे (९), प्रतीक पारखी आणि रोहित झाडे.

**■चंद्रपूर। प्रतिनिधी,**

महाशिवरात्रीच्या पवित्र दिनानिमित्त शिवशंभूच्या दर्शनासाठी गेलेल्या शिवभक्तांच्या उत्साहावर काळाने घाला घातला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यातील पाटाळा नजीक शिवभक्तांचे वाहन उलटून भीषण अपघात झाला. या अपघातात एका १७ वर्षीय तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले आहेत. भूषण विजय दोडके (रा. पाटाळा) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भद्रावती तालुक्यातील पाटाळा परिसरातील शिवभक्त एका मालवाहू वाहनाने भटाळा येथील प्रसिद्ध शिव



मंदिरात त्रिशूळ घेऊन दर्शनासाठी गेले होते. महादेवाचे दर्शन घेऊन परत येत असताना, हे सर्वजण वाटेत असलेल्या राळेगाव येथील जगन्नाथ मठावर दर्शनासाठी जात होते. या प्रवासादरम्यान, पाटाळा जवळील राळेगाव परिसरात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. यामुळे भाविकांनी भरलेले हे वाहन रस्त्याच्या कडेला उलटले. वाहनाचा वेग आणि प्रवाशांची संख्या यामुळे हा अपघात अत्यंत भीषण होता.

या अपघाताचा आवाज ऐकताच परिसरातील स्थानिक नागरिकांनी आणि इतर वाहनधारकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वाहनाखाली दबलेल्या भाविकांना बाहेर काढून तातडीने रुग्णवाहिकेत टाकण्यात आले. यावेळी सर्व काही जखमींना सुरुवातीला वरोरा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच यातील काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना प्राथमिक उपचारानंतर तातडीने चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहे. यातील उर्वरित ५ जणांवर वरोरा येथे उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे.

## मुलुंडमधील मेट्रो दुर्घटनेत एमएमआरडीएची मोठी कारवाई... थेट ५ जणांना अटक

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुलुंड पश्चिम येथे शनिवारी (१४ फेब्रुवारी) दुपारी बांधकाम सुरू असलेल्या सिमेंट मेट्रोच्या खांबाचा काही भाग कोसळला. रस्त्याने जाणाऱ्या रिक्षा आणि एका कारवर हा स्लॅब पडल्याने या घटनेत तीन जण गंभीर जखमी झाले असून एकाच मृत्यू झाला आहे. या घटनेवर मुंबईच्या नवनिर्वाचित महापौर रितू तावडे यांनी "हा १०० टक्के निष्काळजीपणा आहे, दोषींवर कडक कारवाई केली जाईल" अशी प्रतिकिया दिली. रितू तावडे यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली.





मेट्रो लाईन ४ (वडाळा-कासारवडवली) मार्गावर मुलुंड येथे शनिवारी झालेल्या दुर्घटने प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकारी अभियंता सत्यजित साळवे यांना तात्काळ निलंबित करण्याचे निर्देश दिले आहेत.

अशातच आता मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणी एमएमआरडीएने मोठी कारवाई केली आहे. एमएमआरडीएने कार्यकारी अभियंत्याला निलंबित केले असून उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली आहे. त्याच बरोबर मुलुंड पोलिसांनी कंत्राटदार आणि सल्लागार कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांना अटक केली आहे. शनिवारी दुपारी मुलुंड येथील एलबीएस रोडवर मेट्रोच्या कामादरम्यान झालेल्या अपघातप्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन केली आहे. या चौकशी समितीच्या अहवालानंतर दोषींविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असे एमएमआरडीएकडून सांगण्यात आले आहे.

अपघातातील मृत व्यक्तीच्या कुटुंबियांप्रती सहवेदना व्यक्त करतानाच जखमींच्या उपचाराचा खर्च एमएमआरडीए करणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. एमएमआरडीए प्रशासनाकडून दुर्घटनेची माहिती घेतानाच उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सार्वजनिक सुरक्षेशी तडजोड करणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा दिला. या दुर्घटनेची दखल घेत त्यांनी कार्यकारी अभियंता सत्यजित साळवे यांचे निलंबनाचे निर्देश दिले. तसेच मेट्रो ब्रीज मार्गाचे सेफ्टी आणि स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आदेश शिंदेंनी दिले आहेत.

## राज्यभरात 'एटीएस'चे धाडसत्र... यवतमाळमध्ये १४, तर अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी छापे

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यभरात सध्या सुरू असलेल्या एटीएसच्या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे. अशातच विदभार्तील यवतमाळमध्ये पुसद आणि उमरखेडमध्ये १४ ठिकाणी छापेमारी करण्यात आली, तर अहिल्यानगरमध्ये ७ ठिकाणी ह्यएटीएसह्णने छापे मारल्याची माहिती आहे. दहशतवादी संघटनांच्या संपर्कात राहून अनेक तरुणांना सक्रिय करण्याच्या हालचाली आढळल्यानंतर एटीएसने सर्च ऑपरेशन राबवले आहे. त्या अनुषंगाने अनेक भागात जवळपास २१ ठिकाणी 'एटीएस'चे सकाळपासून सर्च ऑपरेशन सुरु असल्याची माहीती आहे. सोबतच या प्रकरणी अनेकांना ताब्यात घेऊन चौकशी केली जात असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. अत्यंत गोपनीय पद्धतीने राज्यातल्या अनेक ठिकाणी एटीएस पथकाकडून चौकशी सुरु आहे. स्थानिकांच्या घरांत जाऊन लोकांची चौकशी केली जात आहे. मात्र कारवाईत पथकाने अद्यापपर्यंत कुणालाही ताब्यात घेतलेले नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली. संभाव्य घातपाती कारवायांच्या पार्श्वभूमीवर एटीएससह तपास यंत्रणांनी कारवाईला सुरुवात केली. कारवाई सुरू असताना यावेळी मोठा बंदोबस्त ठेवला जात आहे.

राज्यात शनिवार रात्रीपासून अनेक भागात एटीएसची गोपनीय कारवाई सुरू आहे. विदर्भातही ४ ते ५ ठिकाणी एटीएसच्या पथकाने कारवाई सुरू केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड आणि पुसद गावात एटीएस पथकाची कारवाई सुरू आहे, तर अकोला जिल्ह्यातील उरळ पोलीस ठाण्यांतर्गत काही भागातही कारवाई सुरू आहे. एटीएसची २० पथके रात्रीपासून उमरखेड आणि पुसद गावात तळ ठोकून आहे. एटीएस प्रमुख चंद्रकिशोर मीणा यांच्या नेतृत्वात विविध पथके तयार करण्यात आली आहेत. या ठिकाणी स्थानिक पोलिसांसह आयपीएस अधिकारी देखील हजर आहे. त्यामुळे या कारवाईत नेमके काय घडतेय हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## महाराष्ट्राच्या पोलिस खात्यात खळबळ!

### संभाजीनगरात पोलिस कर्मचाऱ्याने तब्बल १४ लाखांची लाच घेतली... व्हिडिओ व्हायरल



**■छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी,**

छत्रपती संभाजीनगरमधील एक व्हिडिओमुळे महाराष्ट्राच्या पोलिस खात्यात खळबळ उडाली आहे. एक पोलीस कर्मचारी १४ लाखांची लाच घेताना व्हिडीओ असल्याचा दावा केला जात आहे. हा व्हिडिओ व्हायरल झाल्यावर पोलिस खात्याने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली. या प्रकरणी संबधीत पोलिस कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. संभाजीनगरच्या लेणी परिसरात सुरू असलेल्या अवैध उत्खनवर कारवाई करू नयेत यासाठी एका पोलीस निरिक्षकाने आपल्या रायटरच्या माध्यमातून लाच घेतल्याचा देखील दावा केला जात आहे. व्हिडीओमध्ये एक व्यक्ती १४ लाख रुपये मोजून घेताना दिसत आहे, आणि हा व्यक्ती पोलीस कर्मचारी असल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात लाचेची रक्कम घेतली जात असल्याच्या दाव्याने पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

तर, या सर्व घटनेवर पोलिसांची देखील प्रतिक्रिया आली आहे, व्हिडिओ दिसणाऱ्या पोलीस कर्मचारी निलंबित करण्यात आला आहे. तसेच ज्या पोलीस निरीक्षकावर आरोप करण्यात आले त्यांची पोलीस मुख्यालयात बदली करण्यात आली आहे.

**मंत्री नरहरी झिरवाळांच्या कार्यालयातच लाच घेतली**

दरम्यान, मंत्रालयात लाचखोरीचं मोठं प्रकरण उघडकीस आले. अन्न आणि औषध प्रशासन विभागातील एका लिपिकाला काल एसीबीने अटक केलीय..मंत्रालयाच्या दुसऱ्या मजल्यावरील मंत्री नरहरी झिरवाळांच्या कार्यालयात एसीबीने सापळा रचत लिपिक राजेंद्र ढेरंगेला ३५ हजारांची लाच घेताना रंगेहाथ अटक केलीय...

मेडिकल परवाना निलंबन रद्द करण्यासाठी त्याने एका नागरिकाकडे लाच मागितली होती.एसीबी'च्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, राजेंद्र ढेरंगे याने तक्रारदाराकडे ५० हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यानंतर तक्रारदाराने एसीबीकडे धाव घेतली. पडताळणीत ढेरंगेने लाच मागितल्याचे स्पष्ट होताच मंगळवारी सायंकाळी ६ वाजता सापळा रचण्यात आला आहे. तडजोडीअंती ढेरंगे तक्रारदाराकडून ३५ हजार रुपये घेण्यास तयार झाला. अखेर, ३५ हजाराची लाच घेताना त्याला ताब्यात घेण्यात आले.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## राज्यांतर्गत स्थलांतर थांबावे!



उत्तरप्रदेश राज्याचा अर्थसंकल्प काही दिवसांपूर्वी विधानसभेत सादर करण्यात आला. या अर्थसंकल्पामध्ये उत्तरप्रदेशाच्या शासनाने १० लाख नोकऱ्या देण्याची घोषणा केली आहे. भारतातील एकूण इलेक्ट्रॉनिक्स घटक सिद्ध करणाऱ्या युनिट्सपैकी ५५ टक्के युनिट्स एकट्या उत्तरप्रदेशात आहेत. देशात उत्पादित होर्णाया भ्रमणभाषसंचांपैकी मोठा हिस्सा उत्तरप्रदेशात सिद्ध होत आहे. त्यामुळे उत्तरप्रदेशाला 'मॅन्युफॅक्चरिंग पॉवर हाऊस', अशी नवीन ओळख मिळाली आहे. उत्तरप्रदेशात 'एआय मिशन' स्थापना करण्याची घोषणा केली असून 'टेक युवा-समर्थ युवा'सारख्या योजनेमुळे मुलांना नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. उत्तरप्रदेशातील बेरोजगारीचा दर २.२४ टक्के एवढा न्यून झाला असून राज्याची अर्थव्यवस्था ३० लाख कोटी रुपयांहून अधिक झाली आहे. उत्तरप्रदेशाच्या अर्थसंकल्पाचा येथे एवढ्या विस्ताराने विचार करण्याचे कारण, म्हणजे ते देशातील एक मोठे राज्य आहे. उत्तरप्रदेश आणि त्याच्या शेजारील राज्य बिहार येथून तेथील पायाभूत सुविधा, सोयी, नोकऱ्या यांची वानवा; उपासमारी, बेरोजगारी यांमुळे मोठ्या प्रमाणात तरुण, कष्टकरी यांचे लोंढे महाराष्ट्र, गोवा आणि दक्षिणेकडील राज्यांमध्ये येत होते. स्वतःच्या राज्यातच हाताला काम आणि पिकाला दाम न मिळाल्यामुळे हवालदिल लोक संपन्न राज्ये अन् शहरे यांच्याकडेच मोर्चा वळवत होते. एकट्या मुंबईचाच विचार करता तेथे महाराष्ट्रातून आणि अन्य राज्यांतून येणारे लोक, ते स्थायिक झाल्यानंतर येणारे त्यांचे परिवार यांमुळे मोठ्या प्रमाणात लोकसंख्या वाढली. मुंबईत उत्तर भारतातील राज्यांकडून एवढ्या मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे स्थलांतर होऊ लागल्यामुळे 'लोकसंख्येचे लोंढे', असे नामाभिधान मिळाले. साहजिकच लोकसंख्या स्थलांतराचा मोठा फटका मुंबई, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांना बसला आणि तेथील पाणी, वीज अशा मूलभूत गोष्टींवर ताण निर्माण झाला. झोपडपट्ट्या, अनधिकृत बांधकामे यांचे प्रमाण प्रचंड वाढले आणि त्याचाही पुन्हा ताण शहराच्या नागरी सुविधांवर पडून शहरे बकाल झाली अन् ती अनियंत्रित वाढली, म्हणजे हे लोंढे थांबवण्यापेक्षा सुविधा वाढवण्यावर भर देत राहिल्यामुळे शेवटी प्रशासनाची दमछाक झाली आणि 'हे लोंढे आता थांबलेच पाहिजेत', अशी परिस्थिती निर्माण झाली. उत्तरप्रदेशात योगी आदित्यनाथ यांचे सरकार आल्यानंतर त्यांनी 'यापुढे उत्तरप्रदेशातून कुणालाही रोजगारासाठी स्थलांतर करावे लागणार नाही', अशी घोषणा केली. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हे केवळ घोषणा देऊनच थांबले नाहीत, तर त्यांनी लगोलग तशी कृती, म्हणजे शेतीसाठी अनुदान घोषित करणे, व्यवसायासाठी भांडवल उपलब्ध करून देणे, रुग्णालये, महाविद्यालये आणि विमानतळ बांधणे, अशा प्रकारे आर्थिक साहाय्य अन् पायाभूत सुविधा निर्माण करण्याचा सपाटाच लावला. त्याचप्रमाणे सर्वांत मोठे वरदान, म्हणजे अयोध्या येथे श्रीरामाची झालेली प्राणप्रतिष्ठा! एकटी अयोध्याच उत्तरप्रदेशाचा चेहरामोहरा पालटू शकते एवढी क्षमता आहे. कोट्यवधी लोक अयोध्येला भेट देत असल्यामुळे त्यांच्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि त्यातून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल उत्पन्न होणे, अशा एका मंदिरावर आधारित अर्थव्यवस्थेने तेथे आकार घेतला आहे. अयोध्येसह काशी आणि मथुरा येथेही लोक भेटी देत असल्यामुळे उत्तरप्रदेशाच्या विकासात त्यांचेच मोठे योगदान आहे, यात शंकाच नाही. काही दिवसांपूर्वी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एका कार्यक्रमात सांगितले, 'विदर्भातील तरुणांना मुंबई-पुण्याकडे जावे लागू नये.' गडकरी यांच्या मते गावेच समृद्ध केली, तर गावातील लोक शहरांकडे जाणार नाहीत. गावातील तरुणांना गावातच काम मिळून, म्हणजेच कृषी आधारित उद्योगांवर भर देऊन गावातच उद्योगधंदे उभारले पाहिजेत. गावातच शाळा, महाविद्यालय, रुग्णालय, इंटरनेटची व्यवस्था झाल्यास यासाठी शहरांवर अवलंबून रहाणे टळेल. राज्यांतर्गत स्थलांतर टाळण्यासाठी हे उपायही केले पाहिजेत. राज्यातील निवडणुकांचाच विचार केला, तर आमदार, खासदार यांपेक्षा ग्रामपंचायत निवडणुकांना अधिक महत्त्व असते. गावातील सरपंचपद हे नगराध्यक्ष, आमदार या पदांहून मोठे आहे, अशी ग्रामीण जनभावना आहे. त्यासाठी पुष्कळ खर्चही केला जातो. हाच विचार मूलभूत सोयी-सुविधांच्या संदर्भात केला, तर मात्र त्या गावात केल्या जात नाहीत. परिणामी तरुण स्वतःचे भविष्य, गृहस्थ त्याच्या मुलांचे चांगले भविष्य यांचा विचार करून शहराकडे वळतो. शहरातील अगदी घराच्या जवळ असणाऱ्या सुख-सुविधा लोकांना हव्याहव्याशा वाटतात. त्या सुविधा त्यांना गावात मिळत नसल्यामुळे आणि चांगले जीवनमान जगण्याची गावात शाश्वती नसल्यामुळे ते शहरांकडे वळतात. परिणामी गावेच्या गावे ओस पडतात. केवळ सण-उत्सवांपुरते किंवा काही दिवस सुटीसाठी म्हणून लोक गावातील घरी येतात आणि काही दिवसांनंतर पुन्हा निघून जातात. काही लोक निवृत्तीपर्यंत शहरात थांबणे पसंत करतात आणि निवृत्तीनंतरचे जीवन शुद्ध हवा, पाणी मिळून जगता यावे म्हणून गावी येतात; मात्र गावात आरोग्यसुविधांची न्यूनता आणि अनेक घरे रिकामी असल्यामुळे त्यांना इच्छा असूनही सध्या रहाता येत नाही. परिणामी तेही काही दिवस गावी वास्तव्य करून पुन्हा शहरात जातात. शहरांकडे येणारे लोंढेच्या लोंढे रोखण्यासाठी गावातच चांगली शाळा, महाविद्यालये आणि आरोग्यसुविधा निर्माण केल्या पाहिजेत. शहरातील आरामदायी आणि सुख-सुविधांयुक्त जीवन जगता येण्यासाठी राज्याच्या ग्रामीण भागांतील लोक त्यांच्या भूमी विकून येतात, परिणामी ते भूमीहीनही होतात. त्यामुळे शेतीआधारित लघुउद्योग गावातच होणे आवश्यक आहे. आपल्याकडे १२ बलुतेदार पद्धत पूर्वीपासूनच होती. गावाच्या आवश्यकता गावातच पूर्ण केल्या जायच्या. एखाद्या मोठ्या कामासाठीच एका गावातून दुसऱ्या गावात किंवा नगरांमध्ये प्रवास करावा लागे. विविध कौशल्ययुक्त व्यक्ती गावातच असल्यामुळे लोकांची कामे होतात आणि रोजगारही उपलब्ध होतो. त्यामुळे गावही समृद्ध होते आणि स्थलांतर होत नाही. यातून गावाचा विकासही साध्य होतो. वाढत्या शहरीकरणासाठी सहस्रो कोटी रुपये शहरांवर व्यय केले जातात. परिणामी ग्रामीण जनता शहरांकडे आशाळभूतपणे पाहून तेथेच जाण्याचा पर्याय निवडते. गावात मूलभूत सुविधा निर्माण करण्यासाठीही अर्थसंकल्पात प्रावधान करून त्याप्रमाणे पैसा व्यय केल्यास निश्चितपणे गावकरीही करांच्या रूपात महसूल मिळवून देऊ शकतात. 'स्मार्ट सिटी'पेक्षाही 'स्मार्ट व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याची आवश्यकता आहे, तरच खर्‍या अर्थाने गावे, शहर आणि राज्य यांचा विकास होऊ शकतो!

---



## आता या दुटप्पी भूमिकेचं करायचं काय?

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुका १५ जानेवारी रोजी झाल्या आणि दुसऱ्याच दिवशी (१६ जानेवारी) मतमोजणी झाली. त्यानंतर एक-एक महापालिकांच्या महापौरपदावर नावे जाहीर होत गेली. काही ठिकाणी बिनविरोध तर काही ठिकाणी मतदानाने महापौर निवडले गेले. मात्र, महापौरपदावरून दोन महापालिका चर्चेत राहिल्या. पहिली मुंबई आणि निकालानंतर परभणी महापालिकेचे नाव. मुंबईचे महापौर मराठी असावेत ही ठाकरे गट, मनसेची भूमिका होती तर हिंदू महापौर ही भाजपची भूमिका होती. यावरून निवडणुकीआधी आणि नंतरही वारंवार हवी तशी विधाने दोन्ही बाजूंनी केली जात होती. मुंबई हे महाराष्ट्राच्या राजधानीचे आणि अस्मितेचे शहर असल्यामुळे मराठी महापौर ही भूमिका असायला हरकत नाही. मात्र, हिंदूच महापौर असावा, ही भूमिका कशी असू शकते? मराठी भाषिक मुस्लीम, ख्रिश्चन, जैन, ज्यू किंवा इतर धर्मिय असू शकत नाही का? याकडे हिंदू ही भूमिका मांडताना सोयीस्कर दुर्लक्ष का करण्यात आहे, हा कळीचा मुद्दा आहे. तरीही मुंबईतील महापौरपदाचा मुद्दा सुंठीवाचून खोकला गेला, अशा पद्धतीने निकाली काढण्यात आला आणि रितू तावडे यांना भाजपने संधी दिली. पण भाजपच्या नेत्यांनी जर मुंबईत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरेंची सत्ता आली तर मुंबई महापौर खान होईल, याची पद्धतशीर पेरणी केली होती. म्हणजेच भाजपचा आक्षेप मुस्लीम महापौर होण्याला होता. याचाच अर्थ कर्तृत्वापेक्षा, नेतृत्वापेक्षा कोणत्या धर्माचा महापौर नको, यावर भाजप ठाम होती.

आता वळूया परभणीकडे. परभणी महापालिकेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे सय्यद इक्बाल सय्यद खाजा महापौर झाले आणि जणूकाही जगबुडी झाली अशा पद्धतीने भाजपने टीका करायला सुरूवात केली. औरंगजेबाचा अजेंडा पुढे नेण्याचे काम उद्धव ठाकरेंनी परभणीत केले, असा आरोप भाजपच्या नव्या दम्याच्या प्रवक्त्यांनी केला. प्रत्येक मुस्लीम हा औरंगजेबचा वंशज असल्याचे भाजपला का वाटते, हे गूढच आहे. एपीजे अब्दुल कलाम भारताचे राष्ट्रपती होते, मौलाना अबुल कलाम आझाद स्वातंत्र्य लढ्यात होते. अशफाकउल्ला खान, खान अब्दुल गफार खान, बेगम हजरत महल, रफी अहमद किडवाई, सैफुद्दीन किचलू, युसूफ मेहेरअली अशी अनेक नावे घेता येतील. या सर्वांना तुम्ही एकाच तराजूत तोलणार का? परभणीचे महापौर मुस्लीम झाले यात वावगे वाटण्याचे मुळात कारणच नाही. याचे कारण आपल्या संविधानात आहे. या देशातील कुणीही निवडणूक लढवू शकतो, कुणीही देशाचे नेतृत्व करू शकतो, कुणीही कोणत्याही पदावर काम करू शकतो, यात कुठेही धर्म-जात-पंथ आडवा येऊ शकत नाही. असे असताना आपण आजही धर्म-पंथ-जातीत अडकून राहात असू, तर यापेक्षा या देशाचे दुर्दैव ते कोणते? परभणीत मराठी महापौर करण्याची संधी असताना ठाकरे गटाने मुस्लीम महापौर निवडला, असा आरोप आणि आक्षेप भाजपने घेतला. मग मराठी भाषिक मुस्लीम असू शकत नाही का? मराठी भाषिक ख्रिस्ती असू शकत नाही का? भाजप याकडे दुर्लक्ष करत आहे की जाणूनबुजून धार्मिक कलह निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे? परभणी संदर्भात भाजपने 'औरंगजेब फॅन्स क्लबचा महापौर' अशी टीका करून संविधान तसेच कर्तृत्वापेक्षा धर्म मोठा हेच दाखवण्याचा प्रयत्न केला आहे का? या संदर्भात महापौरपदाची सूत्रे स्वीकारल्यावर इक्बाल सय्यद यांची प्रतिक्रिया खूप बोलकी आहे. 'राजकारणात मी जातपात करायला आलो नाही. त्यांनी जातीपातीवर नाही तर कामावर बोलावे!'. इक्बाल सय्यद यांनी पुढील काळात सर्वांसाठी काम करून हे सिद्ध करून दाखवावे की, लोकांनी आपली जी निवड केलेली आहे ती योग्य आहे. त्यांची निवड चुकलेली नाही. आपण कितीही सुविधा दिल्या तरी मुस्लीम आपल्याला मते देत नाहीत, अशी भाजपची भावना झाल्यामुळे त्यांनी आता तुमच्या मतांची आम्हाला गरज नाही, आम्ही हिंदू एक गठ्ठा मतांवर लक्ष केंद्रित करू, असे ठरवलेले दिसते. त्यामुळे जिथे मुस्लीम दिसेल तिथे त्याचा विरोध करायचा सपाटा त्यांनी लावलेला आहे, असे करताना आपण एक राष्ट्रीय पक्ष आहोत, आपल्या पक्षाचे पंतप्रधान आहे, आणि मुस्लीम याचा देशाचे नागरिक आहेत, याचा भाजपला विसर पडतो हेच एक आश्चर्य आहे.

गंमत म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने शताब्दी वर्षाच्या निमित्ताने मुंबईत 'संघप्रवासाची १०० वर्षे : नवे क्षितीज' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सरसंघचालक मोहन भागवत यांच्या व्याख्यानमालेसाठी अनेक मान्यवरांना आमंत्रित केले होते आणि तेही आवर्जून उपस्थित होते. यात अभिनेता सलमान खान याचाही समावेश होता. सलमान खानच्या उपस्थितीमुळे सर्वांना आश्चर्य वाटले. संघाच्या कार्यक्रमाला सलमान खानला का आमंत्रित केले, असा प्रश्न कुणी विचारला नाही. पण भाजपने परभणीचा महापौर मराठी नाही तर मुस्लीम असल्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. याला दुटप्पी धोरण म्हणतात. भाजपची मुस्लीम भूमिका लक्षात घेऊन सलमान खानच्या उपस्थितीवर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर सलमान खान भारतीय नागरिक नाही का? असा प्रतिसवाल शिवसेनेचे प्रमुख नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. सलमान खान भारतीय आहे मग परभणीचे महापौर सय्यद इक्बाल सय्यद खाजा भारतीय नागरिक नाहीत का, असा प्रश्न महायुतीच्या एकाही नेत्याला का पडला नाही? आपल्याकडे शपथविधी सोहळे अनेकदा होतात. यातील मंत्रिपदाची शपथ काळजीपूर्वक ऐकली तर लक्षात येईल की, कायद्याद्वारे स्थापित झाले आहे अशा भारताच्या संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगेन, मी भारताची सार्वभौमता आणि एकात्मता उन्नत राखेन व महाराष्ट्र राज्याचा मंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक आणि सद्सद्विवेकबुद्धीने पार पाडेन आणि संविधान आणि कायदा यानुसार सर्वतर्हेच्या लोकांना मी निर्भयपणे व निपक्षपातीपणे तसेच कोणाच्याही विषयी ममत्वभाव किंवा आकस न बाळगता न्याय वागणूक देईन, असे यात नमूद केले आहे. म्हणजेच कुणाबद्दल आकस नसेल आणि वागणूक न्याय देणारी, अशी शपथ घेतली जाते. प्रत्यक्षातील चित्र वेगळे दिसते. अनेकदा मंत्र्यांची, नेत्यांची विधाने तेढ निर्माण करणारी असतात. कुणी दुर्सया धमार्ला दोष देतो, कुणी विरोधी पक्षातल्या नगरसेवक किंवा आमदारांच्या निधीत काट मारण्याची जाहीर भाषा करतो, कुणी परराज्यातील लोकांना विरोध करतो, कुणी प्रजासत्ताक दिनी डॉ. आंबेडकरांचा उल्लेख टाळतो, कुणी धार्मिक द्वेषाचा अजेंडा राबवत असतात, कुणी दुर्सयावर कायम भ्रष्टाचाराचे आरोप करतात आणि आरोपीने त्याच्याच पक्षात प्रवेश केला की आरोप हवेत विरून जातात. हे सर्व काय चालले आहे? अनेक धर्म, अनेक प्रांत आणि प्रत्येक प्रांताची वेगळी भाषा तरीही सर्व भारतीय ही आपल्या देशाची खरी ओळख आणि खरी ताकद आहे. पण, देशाला स्वातंत्र्य मिळून ७९ वर्षे झाली आणि कायद्याचे राज्य स्थापन होऊन ७६ वर्षे झाली तरी धर्मद्वेषाचे बीज मरायला तयार नाही. या बिजाला सतत कुणीतरी पाणी घालत असतो.

भारतीय नागरिकांना अजूनही दुधखुळे का समजले जाते? तोंडाने अखंड भारताची भाषा करायची, सतत विकासाचा पाढा वाचायता आणि बगलेत धर्मद्वेषाची सुरी बाळगायची, हे किती दिवस चालणार? मुस्लीम म्हणजे देशद्रोही हा काहींनी पसरवलेला गैरसमज आता बाजूला करण्याची गरज आहे. या धर्मद्वेषाच्या अंगिकारात देश होरपळून जात आहे. विकास कागदावर आणि समाजात अशांतता, जातीभेदाचा रोष जास्त पसरत चालला आहे. परभणीच्या महापौरपदाची निवडणूक हे फक्त निमित्त आहे, निवडून येणारा भारतीय आहे, हे शहाणपण आले नाही तर धर्मद्वेषाच्या आगीत एक दिवस सर्वच होरपळून जातील आणि या दोषाचे धनी आपणच असू, हे लक्षात असू द्या!

---

## बंदुकीच्या छायेत शांततेची प्रतीक्षा

मणिपूरमध्ये ३ मे २०२३ नंतर हिंसाचाराची घटना घडली नाही असा एकही महिना गेलेला नाही. जमीन आणि संसाधने यांवरील नियंत्रणावरून सुरू झालेला संघर्ष आता दीर्घकालीन अशांततेकडे जाईल की काय, अशी भीती निर्माण झालेली असतानाच नव्याने स्थापन झालेल्या सरकारमुळे शांततेची काही आशा आहे का, हे तपासण्यासाठी नजीकच्या इतिहासात डोकवायला हवे.

'सरहद' संस्थेच्या माध्यमातून मणिपूरशी आमचा नियमित संपर्क आहे. तेथील मैतेई समाजाचे २४ विद्यार्थी सरहद संस्थेने शिक्षणासाठी दत्तक घेतले. त्यानंतर कुकी आणि नागा मुलींच्या शिक्षणासाठी सरहद संस्थेने राज्य आणि केंद्र सरकारकडे प्रस्ताव दिला तेव्हा सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सध्या आम्ही या प्रस्तावाला सहकार्य करणार नाही कारण डोंगराळ भागातील विद्यार्थ्यांची पोलिस पडताळणी शक्य नाही, त्या भागातील नोंदी उपलब्ध नाहीत, अशी कारणे दिली. त्यावेळी पहिल्यांदा परिस्थिती कोणत्या दिशेला चालली आहे, याचा अंदाज आला.

इम्फाळ खोर्‍यात राहणारे मैतेई आणि डोंगराळ भागात राहणारे कुकी यांच्यातील वंशिक संघषार्मुळे ३ मे २०२३ रोजी अनुसूचित जमातीचा दर्जा मिळवण्यासाठी निघालेल्या मैतेई समुदायाच्या मोचार्ने गंभीर वळण घेतले आणि हिंसाचाराचा भडका उडाला, तो आजवर धुमसतोच आहे. एका स्वयंसेवी संस्थेच्या अहवालानुसार या हिंसाचारात ८००हून अधिक लोक बळी पडले, तर एक लाखांपेक्षा अधिक लोक स्थलांतरित झाले. ६०० पेक्षा अधिक धार्मिक स्थळे पाडण्यात आली. शेकडो घरे जाळण्यात आली. या हिंसाचारामागे सरकारमधील सत्तापक्ष असल्याचा संशयातून त्याची मोठी प्रतिक्रिया उमटली.

खरं तर मणिपूरमध्ये अशा प्रकारच्या वांशिक संघषार्ला मोठी पार्श्वभूमी आहे. १९५६ साली मणिपूरला केंद्रशासित प्रदेश केल्यापासून छोट्या-मोठ्या प्रमाणात असे संघर्ष होतच होते. अगदी शेवट भारतीय जनता पक्षाची सत्ता येण्यापूर्वी ओकराम इबोबी सिंह यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसशासित मणिपूर सरकारने नव्या सात जिल्ह्यांची घोषणा केली. ओकराम इबोबी सिंह हे मैतेई समाज ाचे नेते. त्यांच्यावरही अनेकदा दहतशवाद्यांनी हल्ला केला होता. तिथला मैतेई समाज मुख्यतः हिंदू असून श्रीकृष्णाचे भक्त आहे, तर नागा आणि कुकी या आदिवासी जमातींमध्ये मुख्यतः ख्रिश्चन धमार्चा प्रभाव आहे. नवीन सात जिल्हे करण्याच्या इबोबी सिंह यांच्या घोषणेमुळे मणिपूरमध्ये विद्वेषाची ठिणगी पडली. हिंसाचार सुरू झाला. नाकाबंदी करून बस जाळणे, सरकारी वाहनांचे आणि मालमत्तेचे नुकसान करणे यांसह काही ठिकाणी तर निरपराध नागरिकांवर हल्ल्याचेही प्रकार घडले. त्या काळात सत्ता मिळविण्यासाठी जी चूक काँग्रेसच्या नेत्यांनी केली त्याला भारतीय जनता पक्षाच्या काही नेत्यांनीही धुमसत ठेवण्यास अप्रत्यक्ष हातभार लावला.



मणिपूरमधील उखरूल जिल्ह्यात नागा आणि कुकी यांच्यामध्ये या आठवड्यात झालेला हिंसाचार ही खूप मोठी धोक्याची सूचना आहे. मैतेई आणि कुकी यांच्या संघर्षात नागा गटांना ओढले गेले तर मग त्याचा दूरगामी परिणाम त्रिजातीय संघर्षात किंवा धार्मिक संघर्षात होऊ शकतो. त्यातून ईशान्य भारत हे वंशिक हिंसाचाराचे केंद्रबिंदू ठरू शकते.

दरम्यानच्या काळात केंद्र सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने ईशान्य भारतात, मुख्यतः नागालँड, मणिपूर मध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी ३ ऑगस्ट २०१५ रोजी नागा बंडखोर गटांबरोबर शांतता करार केला. यातून वांशिक संघर्षातून नागा काही प्रमाणात बाजूला झाले, मात्र या कराराची नीट अंमलबजावणी होऊ शकली नाही.

दुसरीकडे कुकी आणि मैतेई यांच्यामधील परिस्थिती हळूहळू अधिकच गुंतागुंतीची झाली. मणिपुरात मैतेईची लोकसंख्या अधिक असून ते बहुतांश पठारांवर राहतात, तर ९० टक्के कुकी आणि नागा हे डोंगराळ भागात राहतात. सरकार आणि नोकरशाहीमध्ये मैतेई समुदायाचे वर्चस्व असल्याने नव्या सात जिल्ह्यांची घोषणा ही कुकी आणि नागाबहुल भागांवर अतिक्रमण करण्याचे षडयंत्र आहे, या समजातून कुकी आणि नागा समूहाने त्या काळात रस्ते बंद करून आर्थिक नाकाबंदी केली होती. त्यानंतर नागा विरुद्ध मैतेई आणि मैतेई विरुद्ध कुकी असेही संघर्ष झाले. त्याकाळात माजी केंद्रीय मंत्री मोहन धारिया आणि पुण्यात असणारे नागालँडचे निवृत्त मुख्य सचिव अच्युत गोखले यांच्या सहकार्याने आम्ही काही कुकी आणि नागा गटांशी बोलणी करण्यासाठी पुढाकार घेतला, मात्र लष्कराने या संवेदनशील भागात जरुरीपेक्षा जास्त बळाचा वापर करणे राष्ट्रहिताचे नसल्याने संवादातून मार्ग काढावा, असा गोपनीय अहवाल केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम यांना दिल्याचे त्यांनी मोहन धारिया यांना सांगितले.

पुढे २०१७ साली झालेल्या मणिपूरच्या निवडणुकीत काँग्रेसला ६० पैकी २८ आणि भाजपला २१ जागांवर विजय मिळाला. काँग्रेसकडे अधिक जागा असूनही भाजपने स्थानिक छोट्या पक्षांशी संधान बांधून मणिपूरमध्ये सत्ता स्थापन केली. सामान्यपणे मणिपूरसारखे छोटे राज्य केंद्र सरकारच्या सहकार्याशिवाय चालणे अवघड असते. त्यातच पहिल्यांदा भाजपची सत्ता आली आणि एन. बिरेन सिंह मुख्यमंत्री झाले. बिरेन सिंह मैतेई समाजाचे असल्याने त्यांनी मैतेईंना झुकते माप देण्यास सुरुवात केली. दरम्यान, पुन्हा २०२२ सालच्या निवडणुकीत भाजपाने ६० पैकी ३२ जागा जिंकून स्पष्ट बहुमत मिळवले.

मैतेईंना आदिवासींचा दर्जा देऊन डोंगराळ भागातील जमिनी मैतेईंना देण्याचा मुख्यमंत्री बिरेन सिंह प्रयत्न करत आहेत, अशा समजातून मैतेई आणि कुकी या समुदायांमध्ये पुन्हा संघर्ष झाला आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे २ मे २०२३ पासून उसळलेल्या हिंसाचाराने शेकडो लोकांचे बळी घेतले, अनेक महिलांवर अत्याचार झाले. सरकारी मालमत्तेचे मोठे नुकसान झाले. एका संवेदनशील सीमावर्ती राज्यातील हा हिंसाचार एन. बिरेन सिंह यांना नियंत्रित करता आला नाही. त्यांच्याच पक्षाच्या कुकी आमदारावर जीवघेणा हल्ला झाला, स्वतः बिरेन सिंह यांच्या घरावरही हल्ला झाला. या घटनांमध्ये अनेक चर्च पाडली गेली. या बातम्या जगभर आल्याने अनेक देशांच्या संसदेमध्ये यावर चर्चा झाली. त्याचवेळी मंदिरेही पाडली गेल्याने मैतेईंचाही बिरेन सिंह याच्यावर रोष वाढला. दुसरीकडे हिंसाचारही थांबत नव्हता त्यातून १३ फेब्रुवारी २०२५ या दिवशी बिरेन सिंह यांना राजीनामा द्यायला सांगून भाजपचे सरकार केंद्र सरकारने बरखास्त करून राष्ट्रपती राजवट आणली. हिंसाचार थांबण्याचे नाव घेत नसताना खूप मोठ्या प्रमाणात लष्कर आणि निमलष्करी दलांना मणिपूरमध्ये पाचारण करण्यात आले. आजही प्रत्येक ५०० फुटांवर बंदुकधारी सुरक्षादले उभी असतात. दरम्यानच्या काळात केंद्र सरकारकडून सर्व गटांशी अंतर्गत बोलणी करून समोपचाराचा काही मार्ग निघतो का, असे प्रयत्न केंद्र सरकार आणि गुप्तचर यंत्रणांनी केले, पण सततच्या हिंसाचारामुळे सर्व जमातींमध्ये एकमेकांमध्ये असलेला अविश्वास इतका मोठा होता की सर्वमान्य तोडगा निघाला नाही.

त्यातूनच सरकारने ४ फेब्रुवारी २०२६ रोजी मणिपूर विधानसभा पुनरुज्जीवित करून मैतेई समाजाचे युमनाम खेमचंद सिंह यांना मुख्यमंत्री करण्यात आले, तर कुकी समुदायाच्या आमदार श्रीमती नेमचा किपगेन जी आणि नागा पिपल्स फ्रंटचे आमदार एल दिखो यांना उपमुख्यमंत्रिपद देऊन सामाजिक तसेच धार्मिक समतोल साधण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र मणिपूरच्या चुराचंदपूरमध्ये नेमचा किपगेन आणि लोसी दिखो या आदिवासी समुदायाच्या आमदारांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्याच्या विरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने झाली. कुकी आणि नागांवर झालेल्या हल्ल्यांच्या निषेधार्थ त्यांनी सरकारमध्ये सहभागी होऊ नये अशी मागणी करण्यात आली. कुकीबहुल असलेल्या चुराचंदपूर जिल्ह्यात आजही हिंसाचार थांबलेला नाही.

मैतेईबहुल इंफाळमध्ये तणाव असला तरी तेथे लष्करी, निमलष्करी दले मोठ्या प्रमाणात तैनात असल्याने हिंसाचाराच्या घटना कमी घडत आहेत. तर दुसरीकडे या राज्याचा नव्वद टक्के भाग असलेल्या डोंगराळ प्रदेशात सुरक्षादलांना तुलनेने काम करणे अत्यंत अवघड होत आहे.

नवीन मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची निवड झाल्यावर ताबडतोब राज्यात शांतता येईल, असे समजणे चुकीचे ठरेल. कुकीबहुल भागात मुख्यतः आदिवासी ख्रिश्चन असल्याने आणि तेथील चर्च पाडले गेल्याने या भागात लोकांच्या मनात संताप आहे. शिवाय त्या भागात शेजारी देशांशी होणारा अमली पदार्थांचा व्यापार आणि शस्त्रांची देवाणघेवाण यांमुळे खूप मोठ्या प्रमाणात बेकायदा शस्त्रे डोंगराळ भागात आहेत. ज्यांच्या घरातील लोक मारले गेले आहे त्या दोन्ही बाजूच्या लोकांमधला विश्वास पुढील काही वर्षे पुन्हा निर्माण होणे अवघड आहे. ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. या वंशिक हिंसाचाराची मुळे ऐतिहासिक, राजकीय आणि सामाजिक असल्याने केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न समजून त्यावर उपाययोजना करण्यातून हा प्रश्न अधिक गुंतागुतीचा होईल.

मणिपूरमधील उखरूल जिल्ह्यात नागा आणि कुकी यांच्यामध्ये या आठवड्यात झालेला हिंसाचार ही खूप मोठी धोक्याची सूचना आहे. मैतेई आणि कुकी यांच्या संघर्षात नागा गटांना ओढले गेले तर मग त्याचा दूरगामी परिणाम त्रिजातीय संघर्षात किंवा धार्मिक संघर्षात होऊ शकतो. त्यातून ईशान्य भारत हे वंशिक हिंसाचाराचे केंद्रबिंदू ठरू शकते. ज्यामुळे आज केवळ मणिपूर असलेला हिंसाचार नागालँड आणि आसामसारख्या संवेदनशील राज्यात पसरू शकतो आणि तो पसरावा यासाठी शत्रू राष्ट्राकडून प्रयत्न सुरू असतात.

सध्या भारताशी शांतता चर्चेत असलेले गट त्यांच्या भूमिका टोकदार करू शकतात. या वंशिक संघषार्मुळे स्थलांतर, जीवितहानी आणि मानवी हक्कांचे उल्लंघन मोठ्या प्रमाणात होऊ शकते.

आता यावर असा प्रश्न मनात येतो की, शांततेचा यावर मार्ग आहे का? अनेक अभ्यासक यावर विविध मार्ग सुचवतात त्यातील एक मार्ग मणिपूरचे तीन स्वतंत्र राज्यांमध्ये पुर्नगठण करणे हा आहे. पहिले, इंफाळ खोऱ्यातील मैतेई राज्य. दुसरे, डोंगराळ भागात प्रामुख्याने कुकी समाजाची वस्ती असलेले कुकी राज्य आणि तिसरे, नागाबहुल भागांना नागालँडमध्ये सामील करणे किंवा त्यांना स्वायत्तता देणारे नागा राज्य. मात्र यातील एकही मार्ग केंद्र सरकारकडून स्वीकारला जाणे शक्य नाही. जम्मू-काश्मीरसारख्या राज्याला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देणारे सरकार हा तोडगा कदापिही स्वीकारणार नाही. यावर निर्णायक कृती न झाल्यास बंदुकीच्या छायेत शांततेची प्रतीक्षा करण्याशिवाय देशाला आणि मणिपूरच्या जनतेला सध्यातरी दुसरा पर्याय नाही.

---

## कॉपीमुक्ती कधी?

**करिअरला महत्त्वाची दिशा देणारा टप्पा म्हणजे बारावी. नि अर्थातच बारावीची परीक्षा. विद्यार्थ्यांची पुढच्या आयुष्याची वाटचाल अधिक यशस्वी व्हावी, यासाठी बारावी परीक्षेचे महत्त्व आजच्या स्पर्धात्मक युगातही अबाधित आहे.**

राज्यात दहा हजारांहून अधिक उच्च माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ महाविद्याले यांतील १५ लाख ३२ हजारांहून अधिक विद्यार्थी तीन हजार ३८७ केंद्रांवरून बारावी परीक्षेला सामोरे जात आहेत. मराठवाड्यातील सहा लाख विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ठरावीक टक्क्यांपर्यंत गुण मिळवले तरच वैद्यकीय, अभियांत्रिकीसह कला व वाणिज्य शाखेतील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवता येतो. दोन वर्षे ठरावीक ध्येय गाठताना बोर्डाच्या परीक्षेकडे दुर्लक्ष होऊ नये, हा त्याचा मागचा हेतू असावा. ही परीक्षा आणि कॉपी हे समीकरण मिटविण्यासाठी राज्यात गेल्या काही वर्षांपासून अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. सीसीटीव्हीच्या रूपाने थेट परीक्षा हॉलमध्ये नवा पहारेकरी आला. नियंत्रण कक्ष, बैठे पथक, ड्रोन, व्हिडीओ चित्रीकरण, भरारी पथक, दक्षता पथक अन त्यांच्या बैठकांची गर्दी अशा प्रशासकीय योजनांची यादी दरवर्षी लांबत आहे. तरीही 'कॉपीमुक्त' परीक्षेसमोरील गतीरोधक कमी झालेले दिसत नाहीत. इंग्रजीच्या पहिल्याच पेपरला शिक्षकांच्या 'सहकार्याने' सामुदायिक कॉपीचे प्रकार समोर आले. प्रश्नांची उत्तरे शोधताना शिक्षकांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी पुढे येत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला. त्याने सारी यंत्रणाच चक्रावून गेली आहे. परीक्षेसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने अनेक उपाययोजना परीक्षा केंद्रांमध्ये करायला भाग पाडले. प्रत्येक कक्षात सीसीटीव्हीसह भरारी, बैठे पथक नियुक्त केले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तर टोकन पद्धती तपासणी प्रयोग राबविण्यात येत आहे. एवढे करूनही पहिल्याच दिवशी सामुदायिक कॉपीचा धक्कादायक प्रकार अनेक केंद्रांवर घडला. मग नेमके कॉपीमुक्त परीक्षा अभियान कुणासाठी, हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे. राज्य मंडळाने परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी सर्वच परीक्षा केंद्रांवर व वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्हीची सक्ती केली. पर्यवेक्षकासह तिसऱ्या डोळ्याचीही विद्यार्थ्यांवर नजर आहे. जिथे सीसीटीव्ही नाहीत ती केंद्रे पुढील वर्षी बंद केली जातील, असे मंडळाने जाहीर केले. पण जिथे सीसीटीव्ही आहेत तिथे सामुदायिक कॉपी झाल्याचे समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. सीसीटीव्हीत चित्रित झालेला सामुदायिक कॉपीचा प्रकार व्हायरल झाला आणि परीक्षापद्धतीचा ढिसाळ कारभार पुन्हा चर्चेत आला आहे. शिक्षणाधिकाऱ्यांच्या भेटीत केंद्रांवरील विस्कळित बैठक व्यवस्था, शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थी कॉपी करत असल्याचे सीसीटीव्हीत पाहून अधिकारी चक्रावून गेले. एकाच केंद्रावर २०हून अधिक जणांवर गुन्हे नोंदविण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली. प्रश्नांची उत्तरे शोधताना शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा लीलया उपयोग केला. कृत्रिम बुद्धिमता (एआय) तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांना मदत केली गेली, असे समोर येत आहे. मागची परीक्षाही अनेक गैरप्रकारांनी चर्चेत राहिली. यंदा नमनालाच कॉपीमुक्तीचा फज्जा उडाला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभागासह महसूल, पोलिस प्रशासनही सहभागी झाले, त्याला पंधरा वर्षे उलटून गेली. पण कॉपी रोखण्यात पूर्णपणे यश आलेले नाही. याची कारणे राज्याच्या शिक्षण विभागाला शोधावी लागणार आहेत. बारावीची परीक्षा संपत नाही तोच दहावीची परीक्षा सुरू होईल. केवळ प्रशासकीय निर्णय जाहीर करून आणि उपाययोजनांची जंत्री दाखवून कॉपीमुक्तीची अंमलबजावणी होणार नाही. सर्व परीक्षा केंद्रांवर देखरेख ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा, परीक्षा केंद्रांना जोडणे, कॉपी प्रकरण उघडकीस आल्यानंतर तत्काळ कारवाई अशी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. तरच कॉपीमुक्तीचा लढा यशस्वी होईल.



# तूरडाळ पकोडा

**साहित्य :** १ वाटी तूरडाळ, १ कांदा बारीक चिरून, ४ ते ५ लाल मिरच्या, ४ ते ५ कडीपत्ता पाने बारीक चिरून, १ इंच आलेचा तुकडा किसून, चिमूटभर हिंग, चवीपुरते मीठ, तेल तळण्यासाठी.

**कृती :** प्रथम तूरडाळ निवडून धुऊन घ्यावी. नंतर किमान दोन तास पाण्यात भिजत ठेवावी. मिक्सर जारमध्ये लाल मिरची घालून त्याची पेस्ट बनवून घ्यावी. नंतर जारमध्ये निथळलेली तूरडाळ घालावी. त्यातच लाल सुमा मिरचीची पेस्ट घालून मिश्रण भज्याच्या पिठाप्रमाणे बनवून घ्यावे. आता तयार पीठ बाऊलमध्ये काढून त्यात बारीक चिरलेला कांदा, कढीपत्ता, आले, हिंग आणि मीठ घालून मिश्रण चांगले एकजीव करून पंधरा मिनिटे झाकून ठेवावे. आता गॅसच्या मध्यम आचेवर कढईत तेल गरम करावे. भज्याचे पीठ परत एकदा हातानेच मिक्स करावे. आच मंद करून भज्याचे पीठ गरम तेलात सोडावे. भजी हलक्या सोनेरी रंगावर आणि कुरकुरीत झाली की, पेपर नॅपकीनवर काढावीत. म्हणजे जादाचे तेल शोषले जाईल. आता तयार गरम तूरडाळ पकोडा चटणी अथवा केचपसोबत खाणस द्या.

# नेलपेंटचा रंग दर्शवतो तुमची पर्सनॅलिटी

**नखं छान दिसावीत म्हणून आपण नखांना अगदी हमखास नेलपेंट लावतो. हल्ली तर इतक्या निरनिराळ्या प्रकारच्या आणि रंगाच्या नेलपेंट्स बाजारात मिळतात की, कोणता रंग आपण लावावा, असा प्रश्न हमखास अनेकांना पडतो. पण तरीही कितीही पेचात असलो तरी शेवटी आपण आपल्या आवडीचा रंग निवडत असतो. तुमच्या नेलपेंटचा रंग तुमची पर्सनॅलिटी दर्शवत असतो. जाणून घेऊया नेमका तुमच्या आवडीचा नेलपेंटचा रंग तुमच्या पर्सनॅलिटीविषयी काय सांगतो ते...**







**गोल्डन/सिल्व्हर रंग :** काहींना ग्लिटरी रंग लावायला आवडतात. असे रंग लावणाऱ्या व्यक्ती कायमच आकर्षित करणाऱ्या असतात. त्यांना कायम लोकांनी आपल्याकडे पाहत राहावे असे वाटते. त्यांचे व्यक्तिमत्त्व तसे असल्यामुळे तसे होतेसुद्धा म्हणा. गोल्डन, सिल्व्हरचे शेड लावणारे लोक म्हणूनच थोडे खास असतात.

**लाल रंग :** काहींना लाल रंगाच्या शेड्स इतक्या आवडतात की, तुम्हाला कायम त्यांच्या बोटांना लाल रंगाचीच नेलपेंट दिसून येते. लाल रंगामुळे तुमची बोटं अगदी चार चौघात उठून दिसतात. असे व्यक्ती फार सेक्सी, धाडसी असतात. कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची त्यांची तयारी असते.

**काळा रंग :** हल्ली खूप जण काळ्या रंगाची नेलपेंट लावताना दिसतात. काळा रंग हा ट्रेंडमध्ये असला तरी त्यातून तुमचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. काळ्या रंगाची नेलपेंट लावणारे लोक कलात्मक असतात. म्हणजे त्यांना कला क्षेत्राची आवड अधिक असते. फॅशन, संगीत अशा क्षेत्रात काम करणारे व्यक्ती असतात. काळा रंग जरी त्यांची पर्सनॅलिटी खुलवत असेल तरी अशी लोक मनाने फारच हळवी असतात.

**गुलाबी रंग :** आता महिलांना सर्वसाधारणपणे नेलपेंटसाठी आवडणारा रंग म्हणजे गुलाबी. आता या गुलाबी रंगातही बरेच शेड्स आहेत. म्हणजे तुम्ही हॉट पिंक हा शेड लावत असाल,तर तुम्ही बोल्ड विचारांचे असता. त्यांच्यातील सद्सद्विवेकबुद्धी चांगली असते. तर फिकट गुलाबी रंग लावणारे हळव्या मनाचे असतात. त्यांना इतरांची काळजी घ्यायला खूप आवडते. अशा व्यक्तींना इतरांची काळजी फार असते.

**निळा रंग :** हल्ली निळा रंगाच्या नेलपेंट्स लावायला अनेकांना आवडते. निळा रंग शांतता आणि सामंजस्याचे प्रतीक असते. अशा व्यक्ती शांत आणि समजूतदार असतात. त्यांना त्याच्या नियमानुसार वागायलाच आवडते. त्यामुळे कोणताही अन्य मार्ग स्वीकारायला तयार नसतात.

**निऑन रंग :** थोडेसे भडक असे निऑन रंग असतात. त्यामध्ये वेगवेगळ्या रंगाची शेड असते. नवीन आयडियाज आणि नवीन आव्हानांसाठी ही लोक तयार असतात. या लोकांमध्ये कमालीची ऊर्जा असते. यांना नेहमी नव्या कल्पना सुचतात.


**न्यूड रंग :** नखांचा रंगाला जाईल असे रंग म्हणजे न्यूड रंग खूप जणांना आवडतात. अशा व्यक्ती फार स्थिर असतात. त्यांना त्यांच्या तत्त्वांना चिकटून राहायला आवडते. त्यांना त्यांचा क्लास मेंटेन करायला आवडते.

# मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या सततच्या वापराने शरीरावर होऊ शकतात दुष्परिणाम ?

**आपण संपूर्ण दिवसभरात अनेक प्रकारची गॅजेट्स वापरत असतो. या गॅजेट्समार्फत जगभरातील घडामोडी अगदी घरबसल्या आपल्याला समजत असतात. पण या गॅजेट्सच्या सतत वापराचा परिणाम आपल्या आरोग्यावर अनेक प्रकारे होऊ शकतो. गॅजेट्सच्या आहारी गेल्याने निद्रानाशासारखे त्रास जाणवू लागल्याचे आपण अनेकदा ऐकत असतो, पण या गॅजेट्समुळे आपल्या शरीरावरही अनेक प्रकारचे दुष्परिणाम होत असतात, याचा विचार करणेही अगत्याचे आहे.**

काही व्यक्तींना मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे पाहताना सतत डोळे बारीक करून पाहण्याची सवय असते. त्यामुळे डोळ्यांच्या अवतीभोवती सुरकुत्या पडू लागतात, तसेच डोळ्यांवरही सतत ताण जाणवू लागतो. त्यामुळे स्क्रीनकडे बघताना डोळे बारीक करून बघणे टाळावे. कॉम्प्युटर किंवा मोबाइल आपल्या शरीराच्या खूप जवळ ठेवणे हे टाळावे. या गॅजेट्समधून बाहेर पडणारे रेडिओमॅग्नेटिक किरण आपल्या शरीरासाठी हानिकारक असतात. तसेच कॉम्प्युटर किंवा मोबाइल स्क्रीनमधील अल्ट्रा व्हायोलेट किरणांमुळे त्वचा आणि डोळे या दोहोंना अपाय होऊ शकतो.कॉम्प्युटर वर काम करताना आपण वापरतो ती खुर्ची आरामदायक असेल असे पहावे. काही व्यक्तींना दिवसभर कॉम्प्युटरवर काम करावे लागते, त्यांनी या गोष्टीची विशेष काळजी घ्यावी. खुर्ची बसण्यास आरामदायक नसेल, तर त्याचा ताण पाठीच्या मणक्यांवर जाणवायला लागून, पाठदुखीचा त्रास सुरू होऊ शकतो. तसेच सतत बसून काम केल्याने पायांकडे होणारे रक्ताभिसरण व्यवस्थित न होऊन, पायांवर सूज येऊ लागते. असे होऊ नये म्हणून थोड्या थोड्या वेळाने जरासे पाय मोकळे करण्यासाठी ऑफिस मध्येच किंवा घरातल्या घरात पायी चालावे किंवा लिफ्टऐवजी जिन्यांचा वापर करावा. अनेक व्यक्तींना मोबाइल फोन खांद्याच्या व कानाच्या मध्ये धरून, एकीकडे काम करत बोलण्याची सवय असते. अशा पद्धतीने जास्त वेळ बोलत राहिल्यास मानेचे दुखणे उद्भवू शकते. तसेच कॉम्प्युटरवर खाली मान झुकवून काम करत असल्यासही मानदुखीचा त्रास उद्भवू शकतो. त्यामुळे कॉम्प्युटरचा स्क्रीन नेहमी आपल्या डोळ्यांसमोर असेल अशा पद्धतीने ठेवायला हवा.

रात्री झोपायच्या अर्धा तास आधीपासून कॉम्प्युटर किंवा मोबाइलचा वापर करणे थांबवावे. त्याऐवजी मन शांत करणारे आपल्या आवडीचे एखादे चांगले पुस्तक वाचावे, किंवा शांत संगीत ऐकावे. त्यामुळे शांत झोप लागण्यास मदत मिळते.



# खास फीचरसह लॉक करा तुमचं सिमकार्ड, फोन हरवल्यावर किंवा चोरी झाल्यावर देखील राहील सुरक्षित

**जर तुम्हाला तुमचा फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर सिमकार्ड किंवा नंबरचा गैरवापर टाळायचा असेल, तर सिमकार्ड लॉक करता येईल. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्हीमध्ये मिळत आहे.**

स्मार्टफोन्समध्ये कितीही फीचर्स असले तरी त्यात खरा जीव सिमकार्ड टाकल्यावर येतो. कॉलिंग असो किंवा एसएमएस आणि मोबाइल डेटाचा वापर करण्यासाठी सिमकार्डची आवश्यकता असते. विशेष म्हणजे तुम्ही हवं असल्यास तुमचं सिमकार्ड लॉक करू शकता, त्यामुळे फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर त्याचा गैरवापर करता येत नाही.

स्मार्टफोनवर लॉक सेटअप करतो तसं सिमकार्ड पण लॉक करता येतं. जर तुम्ही हे फीचर इनेबल केलं, तर सिमकार्डचा गैरवापर करता येणार नाही. कोणीही दुसरा युजर तुम्ही सेट केलेला पिन एंटर केल्याविना सिम वापरू शकणार नाही. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्ही डिवाइसेजमध्ये सहज इनेबल करता येतं.

### अँड्रॉइड फोनमध्ये असं लॉक करा सिम

- सर्वप्रथम सेटिंग्स ओपन करा आणि मग सिक्युरिटी सेटिंग्स मध्ये जा.
- तिथे सर्वात खाली स्क्रोल केल्यावर मोअर सेटिंग्स वर टॅप करा.
- त्यानंतर सिमकार्ड लॉकची निस्वाद करा आणि पिन सेटअप करा.
- पहिल्यांदा तुम्हाला डिफॉल्ट पिन एंटर करावा लागेल आणि त्यानंतर नवीन पिननं सिमकार्ड लॉक करण्याचा पर्याय मिळेल.
- वेगवेगळ्या टेलिकॉम ऑपरेटर्सचा डिफॉल्ट पिन वेगवेगळा असतो. नवीन पिननं सिमकार्ड लॉक केल्यावर पिन एंटर केल्याविना सिम कार्डचा वापर करता येणार नाही.



### आइओएस डिव्हाइसमध्ये असं लॉक करा सिम

- तुमच्या आयफोनच्या सेटिंग्स मध्ये जा आणि तिथे मोबाइल डाटा वर टॅप केल्यावर सिम पिनचा पर्याय निवडा.
- त्यानंतर डिफॉल्ट पिन एंटर करूनच तुम्हाला पुढे जात येईल.
- पुढे तुम्हाला चेंज पिन ऑप्शनवर टॅप केल्यावर तुमचा नवीन पिन एंटर करावा लागेल, म्हणजे सिम कार्ड लॉक होईल.
- हा पिन एंटर केल्याविना सिमकार्ड वापरता येणार नाही. फोन रीस्टार्ट केल्यावरदेखील हा पिन टाकावा लागेल.

# उच्च रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी जीवनशैलीत करा हे बदल

**आजकाल** प्रत्येक वयोगटातील व्यक्तीला उच्चदाबाचा त्रास होताना दिसत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी, चुकीची जीवनशैली, अधिक मिठाचं सेवन करणं किंवा तणावामुळे अनेक लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होते. उच्च रक्तदाबमुळे (हाय ब्लडप्रेशर) हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. त्यामुळे स्वस्थ राहण्यासाठी आपला रक्तदाब नियंत्रणात असणं गरजेचं आहे. उच्च रक्तदाबाची काही तशी खास लक्षणं नसल्याने तो हळूहळू शरीरात प्रभावित होत जातो. ही समस्या दूर करण्यासाठी दैनंदिन दिनचर्या सुरळीत ठेवणं, त्यात काही आवश्यक चांगले बदल करणं महत्त्वाचं आहे.

उच्च रक्तदाबाची समस्या नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात फळं आणि हिरव्या भाज्यांचं सेवन करणं आवश्यक आहे. त्याशिवाय लो फॅट डेअरी उत्पादने, सुकामेवा, कडधान्यं यासारख्या पदार्थांचं सेवन करणं फायदेशीर ठरतं.

जेवणात मिठाचं प्रमाण कमी केल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या कमी होते. जे लोक दिवसांतून १५०० एमजीहून कमी मिठाचं सेवन करतात त्यांचा रक्तदाब नियंत्रणात राहतो. खाताना कधीही अन्नपदार्थांवरून मीठ टाकू नये.

वजन वाढल्यानेही उच्च रक्तदाबाची समस्या होते. त्यामुळे कॉलेस्ट्रॉल आणि मधुमेह वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे आपल्या उंचीप्रमाणे आपलं वजन नियंत्रणात असणं गरजेचं आहे.

नियमित व्यायाम करणं सर्व आजारांवर सर्वोत्तम उपाय आहे. व्यायामामुळे तणाव कमी करण्यासही मदत होते. त्यामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. दररोज ३० मिनिटं व्यायाम करणं उच्च रक्तदाबावर नियंत्रण मिळवण्यासाठी सर्वोत्तम उपाय आहे.



# तजेलदार त्वचेसाठी आवश्यक आहे हे व्हिटॅमिन्स...

**ड्राय आणि सुरकुतलेल्या त्वचेसाठी आपला आहार जबाबदार आहे. पर्याप्त पोषण मिळाल्यावर आपलीही त्वचा तजेलदार होऊ शकते. तसे तर विभिन्न त्वचेसाठी वेगवेगळ्या आहाराची गरज असते परंतु निरोगी आणि तजेलदार त्वचेसाठी आपल्या आहारात हे व्हिटॅमिन्स असणे गरजेचे आहे. पाहू ग्लोइंग स्किनसाठी आवश्यक व्हिटॅमिन्स...**



**सर्वप्रथम** आपल्याला भरपूर पाणी प्यायला हवं. पाणी स्किनसाठी सर्वश्रेष्ठ औषधी आहे. पाणी आपल्या पूर्ण शरीराला रिफ्रेश करतं आणि आपल्या त्वचेला चमकदार करण्यात मदत करतं. ज्या प्रकारे शरीराला ऑक्सिजनची गरज आहे त्या प्रकारे स्किनसाठी व्हिटॅमिन्स आवश्यक आहे. पुढीलप्रमाणे व्हिटॅमिन्स आपल्या त्वचेला तजेलदार ठेवण्यात मदत करतील :

**व्हिटॅमिन सी :** हे रसदार फळांमध्ये आढळतं जसे संत्रं, लिंबू आणि मोसंबी

**व्हिटॅमिन ए :** याचे मुख्य स्त्रोत आहे- पपई, संत्रं, एग यॉर्क

**व्हिटॅमिन बी :** हे फळांसह सर्व पालेभाज्यांमध्ये आढळतं

**व्हिटॅमिन इ :** हे शेंगदाणे आणि इतर ऑइल सीड्समध्ये आढळतं.

# पायांच्या सुजण्यावर कोरफड एकच रामबाण उपाय

पायांना सूज येण्यामागे अनेक कारणे आहेत. अधिक काळ उभे राहणे, पायाला काही दुखापत होणे, पायामधून रक्त येणे इ. त्यामुळे पायांच्या दुखण्याच्या समस्या वाढतात. चालताना देखील अनेक त्रास होतो. अशा त्रासापासून सुटका करून घेण्यासाठी लोक औषधांचा वापर करतात. औषधांच्या वापरामुळे योग्य फायदा होत नाही. त्यासाठी एक घरगुती उपाय नक्कीच करून पाहा. कोरफडच्या वापरामुळे ही समस्या कमी होण्याची शक्यता आहे. आपल्या रोजच्या जीवनात कोरफडचे अनेक फायदे आहेत.

**कोरफडमध्ये अनेक पोषक तत्त्वे असतात**

कोरफडमध्ये व्हिटॅमिन्स, एन्जाइम्स, सॅलिसिलिक ॲसिड, ॲण्टीऑक्सिडेंट, मिनरल्स, अमीनो ॲसिड हे पोषक तत्त्वे मोठ्या प्रमाणात आढळतात. कोरफडच्या पाण्यात काही वेळ पाय ठेवल्यास अत्यंत फायदा होतो. लागणारे साहित्य

- कोमट पाणी कोरफडचा गर मॉइश्चराइजर

एका बादलीमध्ये कोमट पाणी घ्या, त्यामध्ये कोरफडचा गर एकजीव करून घ्या. आता या पाण्यात अर्ध्या तासासाठी पाय राहू द्या. काही वेळा नंतर पायांना मॉइश्चराइजर लावा.

# पोटाच्या कर्करोगासाठी हळद फार उपयुक्त

**आपल्या** दैनंदिन जीवनात हळदीचा वापर होत असतो. हळदीचा उपयोग फक्त स्वयंपाकासाठी नाही तर इतर कामांसाठी सुद्धा फायदेशीर ठरतो. हळद ज्याप्रमाणे जेवणाला चवदार बनवते त्याचप्रमाणे ती आरोग्यास अत्यंत लाभदायक आहे. फक्त किरकोळ आजारांसाठी हळद फायदेशीर नाही, तर गंभीर आजारावरसुद्धा हळद महत्त्वाची भूमिका बजावते. कक्यूर्मा लॉन्गा (हळदीचे झाड) यांच्या मुळांमधून निघणाऱ्या करक्युमिन पोटामध्ये होणाऱ्या कर्करोगास रोखण्यास मदत करतो.



फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ साओ पाउलो (युनिफासएसपी) आणि फेडरल युनिव्हर्सिटी ऑफ पॅरा (यूएफओ)च्या संशोधकांनी ही माहिती ब्राझिलमध्ये प्रदान केली आहे. कर्क्यूमिन व्यतिरिक्त, हिस्टोन क्रियाकलाप सुधारित करण्यासाठी इतर यौगिकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यात कोल्काल्सी फेरॉल, रेव्हरेट्रॉलोल, क्वार्सेटिन, गार्सनॉल आणि सोडियम बटायट्रेट (आहारातील फायबरच्या निषेधा नंतर आतड्यातील बॅक्टेरियाद्वारे उत्पादित) यांचा समावेश असतो. ग्लोबल कॅन्सर रिसर्च इंटरनॅशनलच्या पोटाच्या कर्करोगाच्या आकडेवारीनुसार, जागतिक पातळीवर प्रत्येक वर्षी एकूण ९ लाख ५२ हजार गॅस्ट्रिक कर्करोग्रस्त रुग्ण आढळले आहेत. ज्यामध्ये अंदाजे ७ लाख २३ हजार रुग्ण कर्करोगाने बळी पडतात. म्हणजे एकूण ७२ टक्के रुग्ण या गंभीर आजाराचे शिकार होतात.

भारत देशात पोटाचा कर्करोग झाल्याची रुग्णांची संख्या सुमारे ६२ हजार एवढी आहे. त्यामध्ये ८० टक्के रुग्ण प्रत्येक वर्षी मृत्युमुखी पडतात. याबाबतीत हेल्थ केअर फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.के. के.अग्रवाल यांनी आपले मत व्यक्त केले आहे. 'पोटाचा कर्करोग हळूहळू विकसित होतो. त्यामुळे सुरुवातीला कोणतीही लक्षणे समोर येत नाहीत.' पोटाच्या कर्करोगाच्या सामान्य लक्षणांमध्ये भूक कमी लागणे, वजन कमी होणे, पोटात दुखणे, अपचन होणे, उल्टी होणे (रक्ताची उल्टी होण्याची शक्यता), पोटाला सुज येणे इ. यापैकी काही लक्षणांवर रुग्ण तत्काळ उपचार घेतो. कारण हे लक्षणे दिसण्यात येतात. परंतु उपचारानंतरही हे आजार कायम राहतात.

कर्करोगाच्या उच्च दराचे प्रमुख कारण म्हणजे, यांत्रिक युगात तणावाचे प्रमाण वाढले आहे. धूम्रपान करणे आजाराचे प्रमुख कारण आहे. पोटाच्या कर्करोगासाठी योग्य वेळी योग्य उपचार घेते महत्त्वाचे आहे. डॉक्टरांचा सल्ला घेणे अत्यावश्यक आहे. पहिल्या काही वर्षांमध्ये ३ ते ६ महिने सतत डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असते, असे वक्तव्य डॉ. के.के. अग्रवाल यांनी व्यक्त केले आहे.

# जांभूळ खा आणि तंदुरुस्त राहा

- जांभळामध्ये असलेल्या मधुमेहविरोधी गुणधर्मामुळे रक्तातील साखर नियंत्रित राहते. जांभळामुळे रक्तातील स्टार्च आणि साखरेचं रूपांतर ऊर्जेमध्ये होतं.
- जांभळाच्या फळासोबतच जांभळाच्या बियांची पावडर, जांभळाच्या झाडाची साले, जांभळाचा रस याचाही मधुमेहाच्या उपचारात चांगला उपयोग होतो.
- जांभळाच्या झाडाच्या सालाची आणि बियांची पावडर पोटाच्या विकारावर गुणकारी असते. डायरिया, अपचन, जुलाब यासारख्या आजारात ती फायदेशीर ठरते.
- जांभूळ नैसर्गिकरीत्या रक्त शुद्ध करते. जांभळामध्ये मोठ्या प्रमाणावर लोह म्हणजेच आर्यन असतं. त्यामुळे जांभूळ खाल्ल्यानेही रक्तातील हिमोग्लोबीन वाढतं.
- जांभळात मोठ्या प्रमाणात 'अ' आणि 'क' जीवनसत्त्वं असतं. तसेच खनिजंही असतात त्याचा उपयोग डोळ्यांचं आणि त्वचेचं आरोग्य सुदृढ ठेवण्यास होतो. रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.
- जांभूळ थंड फळ असल्यानं पोटातील आग आणि अपचन यावर उपयोगी असतं.
- जांभूळ खाल्ल्यानं दात आणि हिरड्या मजबूत होतात. तसेच दात आणि हिरड्यात संसर्ग होत नाही.
- जांभळाच्या बियांची पावडर गायीच्या दुधात मिक्स करून हा लेप चेहऱ्याला लावल्यास चेहऱ्यावरच्या मुरुम, पुटकुळ्या निघून जातात.
- ज्यांना भूक लागण्याची समस्या आहे त्यांनी जांभळाचं व्हिनेगर/ सिरप दिवसातून दोन ते तीन वेळेस पाण्यासोबत समप्रमाणात घेतल्यास भूक वाढते.
- जांभळाच्या ज्यूसचा उपयोग अशक्तपणा, ॲनेमिया यावरही होतो. तसेच जांभळाच्या ज्यूसच्या नियमित सेवनानं स्मरणशक्ती वाढते.



# लिव्हर (यकृत)साठी घरगुती उपाय गुणकारी

**स्मोकिंग, अल्कोहोल, तणाव व जंकफूड या गोष्टीमुळे लिव्हरवर ताण पडतो. यामुळे अनेकांना लिव्हरच्या संदर्भातील आजार उद्भवतात. त्यापासून मुक्तता मिळवायची असेल तर जेवणात नियमित हळदीचा वापर करावा. रात्रीच्या वेळी झोपताना चिमूटभर हळद दुधामध्ये टाकून दूध प्यावे. त्यामुळे तुमचे लिव्हर चांगले राहते व तुम्हाला कफ, खोकला या रोगांपासून मुक्तता मिळेल.**



- आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते तसेच पोटासाठी आवळा फायदेशीर आहे. कारण या आवळ्यामध्ये लिव्हरचे रक्षण करण्याचे गुण असतात.
- जे लोक अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या लिव्हरमध्ये ट्रान्सएमानेज एन्झाइम्सचे प्रमाण वाढते. ज्येष्ठमधातील तत्त्व या एन्झाइमचे प्रमाण लिव्हरमधून कमी करण्यात सक्षम आहेत. त्यामुळे ज्येष्ठमध लिव्हरसाठी लाभकारी ठरते.
- जुने लोक आपल्या तुळशीच्या रोपांसोबत गुळवेलीचेही रोप लावत, कारण गुळवेल ही तुळशीप्रमाणे आपले शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून जुने लोक गुळवेलीची ४-५ पाने दररोज चावून चावून खात.
- जवसाच्या बियांमध्ये साइटोकॉन्स-टीट्यूएंट्स आढळून येते. त्यामुळे हार्मोन्सला एकत्रित होण्यापासून रोखले जाते. यामुळे लिव्हरवर कमी दाब पडतो.
- बीट, कोबी, गाजर, ब्रोकली, कांदा, लसूण, आदी भाज्या लिव्हरसाठी फायदेशीर असतात.

# नव्या अटीला पालकांचा विरोध

## आरटीई प्रवेश प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून सुरू

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागाने शनिवारी जाहीर केले की शिक्षणाचा अधिकार कायदा अंतर्गत प्रवेश प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहे. या वर्षी प्रवेश प्रक्रियेत नवे नियम लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे पालकांना जुनी पद्धत न वापरता नवीन प्रक्रियेनुसारच अर्ज करावा लागणार आहे. ही नवीन प्रवेश प्रक्रिया सरकारने याच महिन्याच्या सुरुवातीला अधिकृतपणे जाहीर केली होती.

**पालकांकडून नाराजी व्यक्त**

दरम्यान, पालकांनी प्रवेश प्रक्रियेच्या उशिरा झालेल्या घोषणेबाबत नाराजी व्यक्त केली आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्यासाठी अवघे तीन महिने शिल्लक असताना ही घोषणा झाल्याने संभ्रम निर्माण झाल्याचे त्यांचे म्हणणे आहे. "आदर्शतः फळए प्रवेश प्रक्रिया डिसेंबर-जानेवारीमध्ये सुरू व्हायला हवी, कारण याच काळात बहुतांश शाळांमध्ये पुढील शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू होते. मात्र, फळए प्रवेश उशिरा सुरू झाल्याने पालकांना पर्यायांचा योग्य विचार करून अंतिम निर्णय घेता येत नाही,ह्व असे एका पालकांनी सांगितले.

जरी सुधारित धोरणात पुढील वर्षासाठी ठरावीक कालमर्यादा निश्चित करण्यात आली असली ज्यात २०२७-२८ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया जानेवारीत सुरू होऊन एप्रिलपर्यंत पूर्ण करावी, असे नमूद आहे. तरी सध्याची प्रक्रिया आधीच वेळापत्रकापेक्षा मागे असल्याचे पालकांचो म्हणणे आहे. "२०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया आधीचा उशिरा सुरू झाली आहे," असेही पालकांनी नमूद केले.




**काय आहेत नवीन नियम?**

नवीन नियमांनुसार, पालकांना फळए प्रवेशासाठी कमाल 10 खासगी विनाअनुदानित शाळांची निवड करता येणार आहे. मात्र, या सर्व शाळा विद्यार्थ्यांच्या निवासी पत्त्यापासून एक किलोमीटरच्या परिसरातच असणे आवश्यक आहे. याशिवाय, आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे अर्ज करतानाच सर्व आवश्यक कागदपत्रे ऑनलाइन अपलोड करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापूर्वी ही कागदपत्रे प्रवेशाच्या वेळी सादर करता येत होती.

फळए कायद्यानुसार, खासगी विनाअनुदानित शाळांमधील 25 टक्के जागा सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राखीव असतात आणि या विद्यार्थ्यांच्या शुल्काची भरपाई राज्य सरकारकडून शाळांना केली जाते. यंदा महाराष्ट्र शालेय शिक्षण विभागने दोन महत्त्वाचे बदल लागू केले आहेत. शाळा निवडीसाठीचे अंतर कमी करणे आणि अर्जाच्या टप्प्यावरच कागदपत्रे सादर करणे. असे नियम लागू करण्यात आले आहेत.

# उत्पन्न घटल्याने पालिकेची आर्थिक कोंडी... करवाढीचा पर्याय पुन्हा चर्चेत

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

वसई विरार महानगरपालिका सध्या आर्थिक अडचणीत सापडली असून येत्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात करवाढीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. विकासकामे, प्रकल्प आणि नियमित खर्च भागवण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध नसल्याने पालिकेसमोर उत्पन्न वाढवण्याचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. महापालिकेचा मुख्य महसूल हा मालमत्ता कर, नगररचना कर, जाहिरात कर आणि स्वच्छता करतून मिळतो. या उत्पन्नावरच शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, गटार व्यवस्था आणि इतर सुविधा अवलंबून असतात. मात्र यंदा मालमत्ता कराची वसूली अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. सुमारे ८६० कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते, पण त्यातील केवळ ३५ टक्के रक्कमच आतापर्यंत जमा झाली आहे. त्यामुळे पालिकेच्या तिजोरीत मोठी तूट निर्माण झाली आहे.




पालिकेला नगररचना विभागातूनही मोठे उत्पन्न मिळते. इमारत बांधकाम परवानग्या, विकास शुल्क, छाननी शुल्क यामधून कोट्यवधी रुपये मिळतात. मात्र चालू वर्षात विभागातील गैरप्रकार उघड झाल्याने काही काळ कामकाज थांबले होते. त्याचा थेट परिणाम महसुलावर झाला. सध्या ही कामे मंद गतीने सुरू असल्याने पालिकेच्या उत्पन्नावर त्याचा परिणाम होत आहे.

मागील वर्षी घरपट्टी, पणीपट्टी आणि इतर संबंधित करांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. १ एप्रिल २०२५ पासून नवीन दर लागू करण्याचे ठरवले होते. मात्र राजकीय विरोधामुळे ही करवाढ प्रत्यक्षात लागू झाली नाही. परिणामी उत्पन्न वाढीचा मार्ग बंद झाला आणि पालिकेसमोरचा आर्थिक ताण अधिकच वाढला.

दरम्यान, अनेक विकसकामांचे कंत्राटदारांचे देयक थकलेले आहेत. निधिअभवी काही प्रकल्पांचा वेग मंदावला आहे. यामुळे येत्या अर्थसंकल्पात उत्पन्न वाढवण्यासाठी करवाढीचा पर्याय पुन्हा पुढे येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याशिवाय नगरसेवकांचे मानधन आणि विविध पदाधिकाऱ्यांचे वाहन भत्ते यासाठी दरमहा लाखों रुपयांचा खर्च होणार आहे. ११५ नगरसेवकांना दरमहा मानधन द्यावे लागणार असून, विविध समित्यांचे सभापती, महापौर, उपमहापौर आणि इतर पदाधिकाऱ्यांवरही मोठा खर्च होणार आहे. या सर्व बाबींचे नियोजन करताना पालिकेला तारेवरची कसरत करावी लागणार आहे.

# मद्याच्या बाटल्यांवर बनावट लेबल लावण्याचा धंदा उघडकीस

■पालघर। प्रतिनिधी,

उत्पादन शुल्क विभागाने मोखाडा तालुक्यातील मोखाडा -खोडाळा रस्त्यावरील देवबांध परिसरात अवैध मद्य वाहतूकीच्या गुन्ह्यात जप्त केलेल्या टेम्पो चालका कडून मिळालेल्या माहितीच्या आधारे छापा टाकून केलेल्या कारवाईत परराज्यातील मद्याच्या बाटल्यांवर बनावट लेबल लावण्याचा गोरखधंदा उघडकीस आणला.कारवाई दरम्यान दमण बनावटीच्या विदेशी मद्याचे ७० बॉक्स, पिकअप टेम्पो, विविध नामांकित मद्य प्रकारातील बनावट लेबल मिळून १७ लाख ६७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पाच आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

उत्पादन शुल्क विभागाचे भरारी पथक आणि डहाणू निरीक्षक कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचार्यांचा समावेश असलेले पथक शुक्रवारी सायंकाळी मोखाडा तालुक्यातील मोखाडा झ्र खोडाळा रस्त्यावर गस्त घालत असताना देवबांध परिसरातील गणपती मंदिरासमोर भरधाव वेगाने जात असलेल्या पिकअप टेम्पोवर संशय आल्याने पथकाने पाठलाग करून टेम्पोची पाहणी केली.

टेम्पोच्या लोखंडी दरवाज्याचे कुलूप तोडून दरवाजा उघडला असता टेम्पोमध्ये दमण बनावटीच्या परराज्यातील मद्याचे खोके आढळून आले.त्यानंतर मद्य साठा जप्त करुन टेम्पो चालक भोरु खंडू बिन्नर याला ताब्यात घेतले. आरोपीची चौकशी केली असता आरोपी कडून देवबांध शिवारातील एका राहत्या घराच्या गच्चीवर मद्य साठा असल्याची माहिती मिळाली.माहितीच्या आधारे उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने संशयीत घराच्या गच्चीवर छापा टाकला असता चार कामगारांकडून महाराष्ट्र राज्यात विक्री करीता असे छापलेले बनावट लेबल परराज्यातील मद्याच्या बाटल्यांवर चिटकवण्याचे काम सुरु असल्याचे आढळून आले.

# उल्हासनगर वालधुनी नदीच्या प्रदुषणात वाढ

■उल्हासनगर। प्रतिनिधी,



शहरामधून वाहाणार्या वालधुनी नदीच्या प्रदुषणात प्रचंड वाढ होत आहे. दररोज अंबरनाथच्या एमआयडीसी येथील रासायनिक कंपन्यांद्वारे निकृष्ट आणि दूषित केमिकलचे पाणी वालधुनी नदीत सोडल्याने नदीतील पाणी काळे पिवळे झाले आहे. एमआयडीसी या प्रदुषणाकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नदी संवर्धन समितीने केला आहे. अंबरनाथ येथील एमआयडीसीमधील रासायनिक कंपन्यांचे दुषित सांडपाणी कोणती रासायनिक प्रक्रिया न करता वालधुनी नदीत दररोज सोडन्यात येत असल्याने ही नदी ही प्रदूषित झाली असून. या केमिकलमुळे नदीच्या पाण्याचा रंग हा दरदिवशी बदलत चालला आहे. या दूषित केमिकलच्या उग्र वासामुळे नागरिकांचे डोळे चूरचुरणे श्वासनाचा त्रास वाढत आहे. एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अभियंता संजय ननवरे यांच्याकडे जल बिरादरी आणि नदी संवर्धन समितीचे अध्यक्ष शशिकांत दायमा यांनी निवेदन देऊन वालधुनी नदीमध्ये होत आलेले प्रदूषण तातडीने थांबवण्याची मागणी केली.

# पंधरा दिवसात पोटची दोन्ही मुलं मारली... उंदीर मारण्याचं औषध पाजून संपवलं

## प्रियकरासोबत मिळून आईने 'असा' रचला कट

■मुंबई। प्रतिनिधी,

आपल्या अनैतिक प्रेमसंबंधांमध्ये अडसर ठरत असलेल्या पोटच्या दोन चिमुरड्यांची एका आईने विष देऊन हत्या केली. ज्या आईच्या कुशीत मुले स्वतःला सुरक्षित समजतात, त्याच आईने प्रियकरासोबत राहण्यासाठी आपल्या १२ वर्षांच्या मुलीचा आणि ७ वर्षाच्या मुलाचा बळी घेतल्याने सर्वांनाच धक्का बसला आहे.

पंजाबच्या भटिंडामधील ही घटना आहे. एकाच घरातील दोन मुलं १५ दिवसांच्या आत मृत्यू झाल्याने गावकऱ्यांना संशय आला आणि त्यानंतर पुढं जे घडलं त्यामुळे माणसाच्या क्रूरतेचा एक चेहरा सर्वांसमोर आला.

**हत्येचा गुन्हा दाखल**

गावकऱ्यांच्या तक्रारीवरून आणि प्राथमिक तपासानंतर पोलिसांनी या आईविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. या संपूर्ण कटात तिच्या प्रियकराची भूमिका काय होती आणि मुलीच्या हत्येच्या वेळीही याच पद्धतीचा अवलंब केला होता का, याचा तपास पोलीस करत आहेत. एका हसत्या-खेळत्या घरातील दोन मुलं अशा प्रकारे विझल्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून आरोपी महिलेवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.

**गावकऱ्यांचा संशय बळावला**

एकाच कुटुंबातील दोन मुलांचा अवघ्या १५ दिवसांच्या अंतराने मृत्यू झाल्याने गावकऱ्यांच्या मनात संशयाची पाल चुकचुकली. मिळालेल्या माहितीनुसार, १५ दिवसांपूर्वी या महिलेच्या १२ वर्षांच्या मुलीचा अचानक मृत्यू झाला होता. त्यावेळी तिला एखादा आजार झाला असावा, असे समजून कुटुंबीयांनी आणि गावकऱ्यांनी कोणतीही पोलीस तक्रार न करता अंत्यसंस्कार केले. मात्र, शुक्रवारी रात्री ७ वर्षांच्या फतेहवीर या लहान मुलाचाही तशाच परिस्थितीत मृत्यू झाल्याने गावकऱ्यांचा संशय बळावला.

**आईचे अनैतिक संबंध**

शनिवारी (१४ जानेवारी) सकाळी गावातील सरपंचांसह मोठ्या संख्येने नागरिक पोलीस ठाण्यात पोहोचले आणि त्यांनी आईच्या वर्तणूकीवर संशय व्यक्त केला. गावकऱ्यांनी आरोप केला की, या महिलेचे दुसऱ्या एका व्यक्तीशी प्रेमसंबंध होते आणि हे दोन्ही निष्पाप जीव तिच्या या नात्यात अडथळा ठरत होते. हा अडसर दूर करण्यासाठी तिने आपल्या मायेला तिलांजली देत मुलांना अन्नातून उंदीर मारण्याचे औषध देऊन त्यांची हत्या केली.




# महाराष्ट्रातील ३३ वर्षीय तरुणी विवाहित प्रियकराकडे गेली, पण तिथं भयंकर घटना

■गोंदिया। प्रतिनिधी,

प्रेमप्रकरणातून होणाऱ्या गुन्ह्यांची संख्या अलिकडच्या काळात वाढत असून दिवसागणित धक्कादायक घटना समोर येत आहेत. अशीच एक घटना मध्यप्रदेशातील भोपाळ इथं घडली असून महाराष्ट्रातील गोंदियातील ३३ वर्षीय तरुणीचा खून करण्यात आला आहे. डेटिंग ॲपवरून सुरू झालेल्या या प्रेमप्रकरणाचा शेवट अत्यंत भयानक झाला असून विवाहित प्रियकराने प्रेयसीचा गळा दाबून खून केला. तसंच नंतर तिचा मृतदेह एका लोखंडी बॉक्समध्ये बंद करून सेप्टिक टँकमध्ये फेकून दिला. स्थानिक पोलिसांनी अवघ्या २४ तासांत या प्रकरणाचा उलगडा केला आहे.



पोलिसांकडून दिलेल्या माहितीनुसार, मृत तरुणीचे नाव सिया असं असून ती ३३ वर्षांची होती. तिचा पूर्वइतिहास वादग्रस्त असल्याचं दिसत आहे. कारण याआधी तिचे तीनदा लग्न झाले होते. ती महाराष्ट्र आणि राजस्थानमध्ये वास्तव्यास होती. त्यानंतर तिची ओळख भोपाळमध्ये राहणाऱ्या समीर नावाच्या व्यक्तीशी एका डेटिंग ॲपवर झाली आणि नंतर इंस्टाग्रामवर त्यांचे नियमित बोलणे होऊ लागले. या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाल्यानंतर समीरच्या प्रेमात सियाने आपले घरदार सोडले आणि ती भोपाळला आली. मात्र, भोपाळल्या गेल्यानंतर नवी माहिती उघड झाली. समीर हा विवाहित असल्याचं सियाच्या लक्षात आलं. तसंच त्याला दोन मुलेही आहेत. मात्र हे समजल्यानंतरही सिया ही समीरवर चौथ्यांदा लग्न करण्यासाठी दबाव टाकू लागली.

समीरने लग्न करण्यास नकार देताच सियाने त्याच्याकडे ५ लाख रुपयांची मागणी केली. तसंच पैसे न दिल्यास कायदेशीर कारवाई करण्याची धमकीही दिली. लग्नासाठीचा दबाव आणि पैशासाठी होणाऱ्या ब्लॅकमेलिंगमुळे समीर आणि सिया यांच्यात मोठा वाद झाला. रागाच्या भरात समीरने सियाचा गळा दाबून खून केला. हा गुन्हा लपवण्यासाठी समीरने आपली आई, भाऊ आणि बहिणीचीही मदत घेतली. या सगळ्यांनी मिळून सियाचा मृतदेह एका लोखंडी पेटीत बंद केला आणि त्यानंतर हा मृतदेह जवळच्या एका रिकाम्या प्लॉटमधील सेप्टिक टँकमध्ये फेकून दिला. मात्र गुरुवारी, जवळ खेळणाऱ्या मुलांना टँकमधून दुर्गंधी येऊ लागल्यानंतर या घटनेचा उलगडा झाला.

# लग्न झालं, पंगत बसली अन् झाला रक्तरंजित राडा, चाकूने सपासप वार... थरकाप उडवणारी घटना महाराष्ट्रात कुठे घडली?

**नेमकं काय घडलं?**

गावातील एका लग्नसमारंभात गौरव जाधव नावाचा तरुण उपस्थित होता. लग्नसोहळ्यादरम्यान पंगतीत जेवताना त्याचा दुसऱ्या तरुणाशी वाद झाला. काही दिवसांपूर्वी पार पडलेल्या कावड यात्रेदरम्यान गौरवचा गावतल्या नितीन सपकाळ या तरुणाशी वाद झाला होता. त्याच कारणावरून लग्नातील जेवणाच्या पंगतीत पुन्हा या दोघांमधील वाद चिघळला. हा वाद वाढताच नितीन सपकाळ याने त्याच्यासोबत असलेल्या मयुरेश दसरकर याच्याकडील चाकू आपल्या हातात घेतला अन गौरवर सपासप वार केले.



■बुलढाणा। प्रतिनिधी,

बुलढाण्यातील कोलवड इथं लग्नाच्या आनंदी वातावरणाचं रुपांतर रक्तरंजित घटनेत झालं. लग्नसमारंभाला हिंसाचाराचं गालबोट लागलं. कावड यात्रेदरम्यान झालेल्या जुन्या वादातून तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आला. या धक्कादायक घटनेत एक जण गंभीर जखमी झाला असून चाकूहल्ला करणारे आरोपी फरार आहेत. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे. याप्रकरणी बुलढाणा शहर पोलिसांत दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या हल्ल्यात गौरव जाधव गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. गौरववर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गौरव आणि नितीन यांच्यातील भांडण सोडवण्यासाठी लग्नातल्या काही पाहुण्यांनी पुढाकार केला असता त्यात तेसुद्धा किरकोळ जखमी झाले. अरुण जाधव नावाच्या व्यक्तीला दुखापत झाल्याची माहिती आहे. या घटनेप्रकरणी पोलिसांत तक्रार नोंदवल्यानंतर बुलढाणा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणाची पुढील तपासणी पोलीस करत आहेत. दोन्ही आरोपी सध्या फरार असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत. बुलढाण्यात भर लग्नसमारंभात चाकूहल्ल्यासारखी धक्कादायक घटना घडल्याने ग्रामस्थांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

घटनेनंतर समोर आलेल्या सीसीटीव्हीमध्ये नितीन आणि गौरव यांच्यात झालेला वाद स्पष्ट पहायला मिळतोय. लग्नसमारंभानंतर जेवणाची पंगत सुरू असताना अचानक दोघं एकमेकांशी भांडू लागतात. यादरम्यान इतर काहीजण त्यांची मध्यस्थी करत वाद मिटवण्याचा प्रयत्न करतात. परंतु तितक्यात एक तरुण चाकूने दुसऱ्यावर सपासप वार करतो आणि तिथून पळून जातो. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही फुटेजमध्ये पहायला मिळत आहे. या फुटेजच्या आधारे पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

# मानखुर्द १९ वर्षीय तरुणीचा गल्लीतल्या अल्पवयीन मुलावर अपहरण करुन अत्याचार

■मुंबई । प्रतिनिधी,

महाराष्ट्राची राजधानी मुंबईतील मानखुर्द परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एका १९ वर्षीय तरुणीने १७ अल्पवयीन मुलाचे अपहरण करुन लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार घडलाय. एकतर्फी प्रेमातून आणि लग्नास नकार दिल्याने तरुणीने हे टोकाचे पाऊल उचलल्याचे पोलिसांच्या प्राथमिक तपासात समोर आले आहे. या घटनेने मुंबईसह राज्यात खळबळ उडाली असून, आरोपी तरुणीवर पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आलाय.

मानखुर्द पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगा आणि आरोपी तरुणी एकाच परिसरात राहणारे आहेत. आरोपी तरुणीचे पीडित मुलावर एकतर्फी प्रेम होते आणि ती गेल्या काही महिन्यांपासून त्याच्यावर लग्नासाठी दबाव टाकत होती.

या प्रकरणाची सुरुवात गेल्या वर्षी ऑगस्ट २०२५ मध्ये झाली, जेव्हा आरोपी तरुणीने मुलाला फूस लावून आपल्या घरी बोलावले आणि त्याच्यासोबत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. इतकेच नाही, तर याबद्दल कोणाला सांगितल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी धमकीही तिने दिली होती. ऑगस्ट २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीत आरोपी तरुणीने मुलाचा मानसिक आणि शारीरिक छळ सुरूच ठेवला. जेव्हा कधी ती घरी एकटी असे, तेव्हा ती मुलाला धमकी देऊन बोलावून घेत असे. तिच्या सततच्या दबावाला आणि धमक्यांना कंटाळून मुलाने अखेर तिच्याशी लग्न करण्यास ठाम नकार दिला. हा नकार सहन न झाल्याने तरुणीने आधी स्वतःला इजा पोहोचवण्याची धमकी दिली आणि नंतर संधी साधून मुलाचे अपहरण केले.

**आरोपी फरार, पोलिसांचा शोध सुरु**

गुन्हा दाखल झाल्याची माहिती मिळताच आरोपी तरुणी फरार झाली आहे. मानखुर्द पोलीस तिचे लोकेशन ट्रेस करण्याचा प्रयत्न करत असून, तिला अटक करण्यासाठी एक विशेष पथक तयार करून शोधमोहीम तीव्र केली आहे. या घटनेमुळे समाजात एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या गुन्हेगारीची भीषणता पुन्हा एकदा समोर आली आहे. तसेच, लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये केवळ महिलाच नव्हे, तर पुरुष आणि विशेषतः अल्पवयीन मुलेही बळी पडू शकतात, ही वस्तुस्थिती अधोरेखित झाली आहे.

पीडित मुलगा कसातरी आरोपीच्या तावडीतून निसटण्यात यशस्वी झाला आणि त्याने घरी पोहोचून आपल्या कुटुंबीयांना संपूर्ण आपबिती सांगितली. मुलाच्या शरीरावर आणि मनावर झालेले आघात पाहून कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. त्यांनी तात्काळ मानखुर्द पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. मानखुर्द पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पीडित मुलाचा जबाब नोंदवून घेतला. त्याआधारे, आरोपी तरुणीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या अपहरण संबंधित कलमांखाली आणि लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याच्या विविध कलमांखाली एफआयआर दाखल करण्यात आला आहे. पॉक्सो कायदा हा लहान मुलांना लैंगिक अत्याचारापासून संरक्षण देण्यासाठी बनवलेला एक अत्यंत महत्त्वाचा कायदा आहे, जो १८ वर्षांखालील कोणत्याही मुला-मुलीला संरक्षण प्रदान करतो.



# अंधार पडलाय म्हणून रात्री घरी राहिले अन् मावसबहिणींवर केला बलात्कार

एका २२ वर्षीय विवाहित महिलेवर आणि तिच्या १७ वर्षीय अल्पवयीन बहिणीवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पीडित महिलेचा पती कामानिमित्त गुजरातमध्ये असतो, त्यामुळे आपल्या लहान मुलीच्या देखभालीसाठी तिने अल्पवयीन बहिणीला सोबत ठेवले होते. याचाच फायदा घेत महिलेचा मावस भाऊ आणि त्याच्या मित्राने या दोघींना आपल्या जाळ्यात ओढले आणि त्यांच्यावर अत्याचार केले. मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर मधील ही घटना आहे.

**जीवे मारण्याची धमकी देऊन अत्याचार**

दोघी पीडित बहिणी मंदिरातून परतत असताना अंधार झाल्यामुळे त्यांच्या मावस भावाने आणि अमन खान नावाच्या त्याच्या मित्राने त्यांना घरी सोडतो असे सांगितले. रात्री उशीर झाल्याचे कारण सांगून ते दोघेही पीडितेच्या घरी थांबले. रात्रीच्या वेळी दोन्ही नराधमांनी या बहिणींना जीवे मारण्याची धमकी दिली आणि त्यांच्यावर बलात्कार केला. धक्कादायक म्हणजे, आरोपी मावस भावाने यापूर्वीही पीडित महिलेसोबत अत्याचार केला होता, मात्र भीतीपोटी तिने तेव्हा कोणालाही काही सांगितले नव्हते.

**लग्नाचे अमिष दाखवले**

अत्याचार केल्यानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी आरोपींनी लग्नाचे आमिष दाखवून दोघींनाही सोबत घेतले. रेल्वे स्टेशनवर पोहोचल्यावर प्रवासासाठी आणि राहण्या-खाण्यासाठी पैसे नसल्याचे नाटक करत आरोपी मावस भावाने पीडितेकडून ४० हजार रुपये रोख आणि चांदीचे जोडवे हडपले. त्यानंतर दोघींनाही तिथेच सोडून मावसभाऊ आपल्या मित्रासह पसार झाला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित महिला जेव्हा मावशीच्या घरी चौकशीसाठी गेली, तेव्हा तिथेही आरोपी सापडला नाही.

**शेवटी आई-वडिलांना सांगितले**

शेवटी पीडित महिला माहेरी पोहोचली असता तिला तिथे आरोपी मावस भाऊ दिसला. जेव्हा तिने पैशांची मागणी केली तेव्हा त्याने तिला जीवे मारण्याची धमकी दिली. अखेरीस हिंमत एकवटून पीडितेने आपल्या आई-वडिलांना सर्व प्रकार सांगितला आणि पोलिसांत धाव घेतली. एसडीओपी मनीष यादव यांनी सांगितले की, याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com